१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड | गुरुवार । दि. १० सप्टेंबर २०२६ । अंक ९६ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## आज आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण

**रायगड :** रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक दिनी (दि.५) सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात आले. जिल्ह्यातील १५ शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.तसेच एक विशेष शिक्षक पुरस्कारही देण्यात येणार आहे. गुरुवारी (दि.१०) सप्टेंबर रोजी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाट्यगृह येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवही केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषद प्राथमिक •➤पान २ वर

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू

**पाली /बेणसे :** रायगडच्या सुधागड तालुक्यातील परळी येथील कुंभारआळी येथे राहणारे कुणाल विठ्ठल पवार (वय ४२) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. याप्रकरणी येथील जानकी हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याचा गुन्हा पाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की २० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास कुणाल पवार यांच्या हाताला मुंग्या येत असल्याने आणि उच्च रक्तदाबाचा त्रास जाणवत असल्याने त्यांच्या पत्नी शारदा पवार यांनी •➤पान २ वर

# रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षक रस्त्यावर!

**समायोजनासाठी आलेल्या 351 शिक्षकांची गैरसोय; प्रशासनाच्या नियोजनावर नाराजी**



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या शिक्षकांना कुंटे बागेतील शिवतीर्थावर ताटकळत बसावे लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले. पावसाच्या दिवसात भर उन्हात बसण्याची वेळ या शिक्षकांवर आली. बसण्याची कसलीच व्यवस्था नसल्याने शिक्षकांना झाडाच्या सावलीचा आधार घेत रस्त्यावर आसन मांडावे लागले. एकीकडे शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यासाठी पुढाकार घेत असताना दुसरीकडे समुपदेशनासाठी आलेल्या शिक्षकांना अधिकारी वेळेवर हजार राहिले नसल्याने रस्त्यावर बसण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. अधिकाऱ्यांच्या विलंबाने येण्याचा त्रास शिक्षकांना सहन करावा लागला

शिक्षकांच्या सोयी, शाळांमधील अंतर आणि उपलब्ध रिक्त जागांचा ताळमेळ साधण्यासाठी हे समायोजन करण्यात येत होते. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून राबविण्यात येणाऱ्या या प्रक्रियेसाठी शिक्षक सकाळपासूनच कुंटेबाग येथे दाखल झाले होते. सकाळी नऊ वाजता प्रक्रिया सुरू •➤पान २ वर

### शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने पवित्र पोर्टलअंतर्गत शिक्षकांचे समुपदेशन व समायोजन बुधवारी (दि. ९) कुंटेबाग येथील जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या सुमारे ३५१ शिक्षकांना मात्र प्रशासनाच्या नियोजनाअभावी रस्त्यावर बसण्याची वेळ आली. या प्रकारामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

## खोपोलीतील घोटाळाप्रकरण वादाच्या भोवऱ्यात

**भाजपचे नगरसेवक आणि मुख्याधिकारी आमने सामने**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

खोपोली नगरपरिषदेच्या प्रशासकीय काळात विकासकामांच्या नावाखाली १०० कोटीचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजपचे नगरसेवक सानिया शेख यांनी केला आहे. मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी त्यांच्या आरोपांचे खंडन केले असून बदनामीकारक व खोटे आरोप असल्याचा दावा त्यांनी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे खोपोलीतील १०० कोटींचे घोटाळाप्रकरण वादाच्या भोवऱ्यात सापडले असून भाजपच्या नगरसेविका आणि मुख्याधिकारी आता आमने-सामने आले आहेत. यामध्ये कोण जिंकणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली नगरपरिषदेवर गेली अनेक वर्षापासून प्रशासकीय राजवट होती. निवडणुका न झाल्याने मुख्याधिकारी पंकज पाटील प्रशासकीय अधिकारी म्हणून कामकाज पाहत होते.मागील दहा महिन्यापूर्वी नगरपरिषदेची निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपच्या सानिया शेख या नगरसेवक म्हणून निवडून आल्या. त्यांनी निवडून आल्यावर नगरपरिषदेच्या प्रशासकीय काळातील कामांची माहिती घेतली. कागदोपत्री माहिती गोळा केली. या काळात गार्डन सुशोभीकरण आदीसह विविध विकास कामांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. यामध्ये तब्बल शंभर कोटींचा घोटाळा विकास कामांच्या नावाखाली झाल्याचा आरोप शेख यांनी केला.या आरोपामुळे खोपोलीमध्ये खळबळ उडाली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करून चौकशी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.भाजपच्या नगरसेविकांच्या •➤पान २ वर

## वेधक

### महावितरणचा १२०० वीजचोरांना शॉक

**कल्याण :** महावितरणच्या कल्याण परिमंडळात विविध पथकांनी ऑगस्ट महिन्यात घातलेल्या धाडीत ११८९ ठिकाणी वीज चोऱ्या सापडल्या आहेत. वीज चोरट्यांनी २ कोटी १३ लाख रुपये किंमतीची वीज चोरी केली आहे. महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांना म हावितरणकडून कायदेशीर नोटीस बजावली असून विहित मुदतीत पैसे न भरल्यास त्यांच्यावर वीज कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. महिनाभरात उल्हासनगर १ आणि २ विभागात सर्वाधिक ४२० वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली आहे. चोरट्यांनी ४३ हजार युनिट वीज चोरी केली आहे. पालघर जिल्ह्यात •➤पान २ वर

### गणेशभक्तांसाठी मध्य रेल्वेचा दिलासा

**कोलाड :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेतर्फे ३४ अतिरिक्त विशेष गणपती गाड्या चालविण्यात येणार आहेत. यामध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव दरम्यान ४ आरक्षित विशेष गाड्यांसह पनवेल चिपळूण पनवेल दरम्यान ३० अनारक्षित मेमू सेवा सुरू करण्यात येणार आहेत. पनवेल चिपळूण मार्गावर धावणाऱ्या विशेष मेमू सेवेमुळे रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळणार आहे. या सेवेमध्ये गाडी क्रमांक ०११५९ पनवेलहून दुपारी ३.३० वाजता सुटून चिपळूण येथे रात्री १०.३० वाजता पोहोचेल. तर ०११६० ही गाडी चिपळूणहून •➤पान २ वर

### अधिकारी जाणार शाळेत

**रायगड :** राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांमध्ये भौतिक सुविधा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जपणूक करण्यासाठी राज्यभरात 'चला शाळेत जाऊया' अभियान राबवले जाणार आहे. त्यानुसार शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन अभियानात सहभागी होणार आहेत. चला शाळेत जाऊया अभियानादरम्यान शिक्षण विभागातील अधिकारी २२ व २३ सप्टेंबर आणि ७ व ८ ऑक्टोबरला संबंधित जिल्ह्यातील शाळांना भेटी देतील. त्यांच्या भेटीचा आढावा घेण्यासाठी संबंधित विभागाचे अध्यक्ष हे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील. ते दर १५ दिवसांनी कामांचा आढावा घेऊन शिक्षण आयुक्तालयास अहवाल सादर करावा लागणार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण •➤पान २ वर

## भरतीने स्कॉर्पिओला दाखवला हिसका!

- समुद्रकिनारी हौसेचा थाट पडला महागात
- अतिउत्साही पर्यटकांची गाडी वाळूत रुतली



| उरण | प्रतिनिधी |

समुद्रकिनाराम्हणजे मौजमजेची जागा की गाड्या दामटण्याचा रस्ता? असे म्हणण्याची वेळ आली आहे. माणकेश्वर-दांडा समुद्रकिनाऱ्यावर हौसेपोटी वाळूत स्कॉर्पिओ नेणाऱ्या सहा पर्यटकांना भरतीच्या पाण्याने चांगलाच हिसका दाखवला. वाळूत रुतलेली गाडी भरती वाढताच पाण्यात अडकली. सुदैवाने पर्यटक सुखरूप बचावले; मात्र स्कॉर्पिओचे मोठे नुकसान झाले.

पर्यटक सोमवारी स्कॉर्पिओमधून माणकेश्वर-दांडा समुद्रकिनारी आले होते. वाळूत गाडी चालवण्याची हौस भागवल्यानंतर त्यांनी ती किनाऱ्यावरच उभी केली. भरतीचे पाणी हळूहळू गाडीच्या •➤पान २ वर

## स्मार्ट मीटर विरोधात सोशल मीडियावरही पडसाद

**शेकापच्या आंदोलनाला नागरिकांचा प्रतिसाद**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात शेतकरी कामगार पक्षाने पुकारलेल्या आंदोलनाला आता सोशल मीडियावरूनही मोठा प्रतिसाद मिळू लागला आहे. समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्मार्ट मीटरला विरोध दर्शवत शेकापच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला असून, नागरिकांनीही या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन सोशल मीडियातून केले जात आहे.

सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत आक्रमक भूमिका घेणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाने रायगड जिल्ह्यात स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात आंदोलनाची तयारी सुरू केली




आहे. गणेशोत्सवानंतर या आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्यात येणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील आणि महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी स्मार्ट मीटरविरोधात भूमिका घेतली आहे.

स्मार्ट मीटर बसविण्यास नागरिकांचा विरोध असतानाही महावितरणकडून मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. नागरिकांना विश्वासात घेऊन आणि स्मार्ट मीटरबाबत संपूर्ण माहिती देऊनच निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी शेकापकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढत •➤पान २ वर

> "संस्थेमध्ये सोलर सिस्टीम बसविण्यात आली आहे. सोलर सिस्टीममुळे वीज जास्त तयार होऊनही बील भरावे लागले. बिलाचे पैसे शिल्लक असतानाही जादा युनिटचे पैसे मागण्यात आले. स्मार्ट मीटर लावल्याने बील अधिक वाढत आहे. त्यात नागरिकांमध्येही स्मार्ट मीटरबाबत नाराजी आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरविरोधात सोशल मिडीयावर पोस्ट टाकली असून याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनीदेखील जनतेला न्याय देणारा मुद्दा घेतला आहे. आगामी काळात स्मार्ट मीटरच्या वाढीव बिलाबाबत वकीलांसोबत चर्चा करून कार्यवाही करण्यात येईल."
>
> -सुरेश पाटील, संस्थापक अध्यक्ष आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग

## मुंबई-गोवा महामार्गावर अपघात


| पोलादपूर | प्रतिनिधी |

बुधवारी ( दि. ९ ) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या समोरील मुंबई-गोवा महामार्गावर उभ्या असलेल्या टेम्पोला मागील बाजूने अशोक लेलँड आयफाय टेम्पो येऊन जोरदार धडकला. या अपघातात लेलँडचा क्लीनर जागीच ठार झाला तर चालक किरकोळ जखमी झाला.

पोलादपूर येथे मुंबईकडून गोव्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर आयशर टेम्पो चालक बळीराम सोलंकी (वय ४६ वर्षे पीदमपूर, मध्य प्रदेश) याने कोणत्याही प्रकारच्या सांकेतिक पार्किंग लाईट न लावता धोकादायक स्थितीत उभा केला होता. यावेळी अशोक •➤पान २ वर

## पावसाअभावी भातशेती संकटात

- शेतकरी वर्गाची चिंता वाढली
- उत्पादनावर होणार परिणाम



| खांब | प्रतिनिधी |

कोकण प्रांत हा भातशेतीसाठी विशेष प्रसिद्ध असून, रायगड जिल्ह्याची ओळख तर 'भाताचे कोठार' म्हणून केली जाते. मात्र, यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीपासूनच पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने भातशेतीची विविध कामे दिरंगाईने झाली आहेत. त्यातच सध्या पावसाचा जोरही म्हणावा तसा नसल्याने भातशेतीच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे.

भात लागवडीसाठी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाऊस पडणे अत्यंत आवश्यक असते. पावसाच्या अनिश्चिततेमुळे यंदा शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुरुवातीच्या काळात पावसाने ओढ दिल्याने शेतीची मशागत, रोपवाटिका, भातलावणी आदी कामांचे नियोजन विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी भातलावणीची कामे अपेक्षेपेक्षा उशिराने पूर्ण झाली.सध्या भातपीक वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात असताना पावसाचा जोर कमी असल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. पावसाचे प्रमाण असेच कमी राहिले, तर भातपिकाच्या वाढीवर तसेच अंतिम उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची •➤पान २ वर

## गणेशमूर्ती नेणाऱ्या वाहनाला धडक

| खोपोली | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या एका वाहनाचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. मागून येणाऱ्या सिमेंट टँकरने धडक दिल्याने हा अपघात झाला असून यामध्ये चार जण जखमी झाले आहेत. सकाळच्या सुमारास झालेल्या या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि. ९) सकाळी ८ वाजून २५ मिनिटांच्या सुमारास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हा अपघात घडला. पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका टँकरने गणेशाची •➤पान २ वर

## साक्षरतेसाठी 'उल्लास'चा जागर

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील निरक्षर नागरिकांना साक्षरतेच्या प्रवाहात आणण्यासाठी उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. निरक्षर नागरिकांनी साक्षर होण्यासाठी उल्लास ॲपवर आपले नाव नोंदवावे, तसेच समाजातील •➤पान २ वर

**ॲपवर निरक्षरांची नोंदणी वाढविण्याचे आवाहन**

### शाळा हे अंमलबजावणीचे प्रमुख केंद्र

महाराष्ट्र शासनाने केंद्र पुरस्कृत उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम स्वीकारला असून, शासन निर्णयानुसार राज्य, जिल्हा, गट आणि शाळास्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शाळा हे प्रमुख एकक राहणार आहे. शाळांमार्फत लाभार्थी निरक्षर व्यक्ती तसेच स्वयंसेवी शिक्षकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबात निरक्षर व्यक्ती नाहीत, अशा विद्यार्थ्यांनाही त्यांच्या परिसरातील निरक्षरांना साक्षर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.




**वस्तूंच्या किंमतीमध्ये दहा टक्क्यांनी वाढ | महागाईकडे दुर्लक्ष करीत खरेदीचा उत्साह**

## सजावटीच्या साहित्याने बाजारपेठा सजल्या

प्रमोद जाधव

| रायगड |

गणरायाचे आगमन आता चार दिवसांवर येऊन ठेपले आहे. सजावटीसह पूजेच्या साहित्यांनी जिल्ह्यातील बाजारपेठा सजल्या आहेत. खरेदीची लगबग वाढली आहे. मात्र वेगवेगळ्या साहित्यांच्या किंमतीमध्ये दहा टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे वस्तु खरेदी करण्यासाठी अधिक पैसे मोजण्याची वेळ भक्तांवर आली आहे. महागाईची झळ असताना त्याकडे दुर्लक्ष करीत भक्तांचा खरेदीचा उत्साह वाढला असल्याचे दिसून आले.





गणरायाचे आगमन १४ सप्टेंबरला घरोघरी होणार आहे. घरगुतीसह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. गणेशमूर्ती प्रतिष्ठापना करण्यासाठी सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्यांची दुकाने जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये सजल्या आहेत. अलिबाग, पेण, पनवेल, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड यांसह जिल्ह्यातील शहरी भागासह ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्येही सजावटीच्या •➤पान २ वर

### अनेकांना रोजगाराची संधी

गणेशोत्सवाच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यामध्ये सजावटीसह पूजेच्या साहित्यांसाठी वेगवेगळी दुकाने उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यातील गावपातळीवरील लहान मोठ्या बाजारपेठांसह शहरी भागातील बाजारपेठांमध्ये नाक्यानाक्यावर वेगवेगळ्या वस्तूंची दुकाने सजली आहेत. अगरबत्ती, मेणबत्तीसह पूजेचे लागणारे अन्य साहित्य, रेडीमेड फुले, माळा अशा अनेक वस्तूंची दुकाने आहेत. तसेच बाप्पाच्या स्वागतासाठी घराची साफसफाई करण्यापासून रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे अनेकांना रोजगाराची संधी या कालावधीत उपलब्ध झाल्याचे चित्र आहे. साहित्य विक्रेते आणि लहान व्यावसायिकांनाही रोजगाराची संधी मिळत आहे. गणेशोत्सवाच्या दिवसांमध्ये या साहित्याची विक्री वाढत असल्याने छोट्या व्यावसायिकांसाठी हा महत्त्वाचा हंगाम ठरत आहे.

पान १ वरून

## खोपोलीतील घोटाळा प्रकरण वादाच्या भोवऱ्यात

या आक्रमक भूमिकेला मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी खुले आव्हान दिले आहे. त्यांनी हे आरोप खोटे व बदनामीकारक असल्याचा दावा केला आहे. प्रशासकीय कारकिर्दीत शंभर कोटीची बिले अदा झाली नाहीत. अपूर्ण माहितीच्या अधारे नगरपरिषदेची बदनामी केली आहे. त्यामुळे मानहानीची नोटीस बजावण्यात आली आहे, अशी माहिती सुत्रांकडून प्राप्त झाली आहे.भाजपच्या नगरसेविका सानिया शेख आणि मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्यामधील वाद आता पेटला असून यामध्ये काय सत्य समोर येईल, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयानंतर स्पष्ट होणार आहे. याबाबत मुख्याधिकारी पंकज पाटील, नगरसेविका सानिया शेख यांच्याशी संपर्क साधला, मात्र होऊ शकला नाही.

## महावितरणचा १२०० वीजचोरांना शॉक

३६९ वीज चोऱ्या या काळात पकडण्यात आल्या. येथे वीजचोरांनी १ लाख ६३ हजार वीजयुनिट चोरी केल्याचे आढळून आले. विरार आणि कल्याण ग्रामीण विभागात प्रत्येकी २०४ वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली आहे.वरील पैकी १६७ वीज ग्राहकांनी तडजोड शुल्कापोटी ५ लाख ७७ हजार रुपये शासनाच्या तिजोरीत जमा केले आहे. उर्वरित वीज ग्राहकांवर विहीत मुदतीत तडजोड शुल्क न भरल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी दिली आहे.

## गणेशभक्तांसाठी मध्य रेल्वेचा दिलासा

सकाळी ९ वाजता सुटून पनवेलला दुपारी २.३० वाजता पोहोचेल.या विशेष मेमू गाड्यांना पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि अंजनी येथे थांबे देण्यात आले आहेत.या दोन्ही गाड्या १० ते १४ सप्टेंबर २०२६ तसेच १८ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धावणार असून १५ ते १७ सप्टेंबरदरम्यान ही मेमू सेवा चालवली जाणार नाही, अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे. या गाड्यांची रचना ८ डब्यांच्या मेमू डब्यांची असणार आहे.गणेशोत्सवाच्या काळात कोकणात मोठ्या प्रमाणात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेच्या या निर्णयामुळे गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुखकर होण्यास मदत होणार आहे.

## जिल्हा परिषदेचे शिक्षक रस्त्यावर!

होणे अपेक्षित असताना संबंधित अधिकारी व पदाधिकारी उशिरा दाखल झाल्याने समायोजनाची प्रक्रिया सुमारे दोन तास उशिराने सुरू झाली. सुरुवातीला अवघड क्षेत्रातील शाळांना प्राधान्य देण्यात आले. त्यानंतर दक्षिण रायगडमधील शाळांमध्ये शिक्षकांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, सकाळपासून आलेल्या शिक्षकांसाठी प्रशासनाकडून बसण्याची पुरेशी व्यवस्था करण्यात आली नव्हती. त्यामुळे काही शिक्षकांनी झाडाच्या सावलीचा आधार घेतला, तर काहींनी थेट रस्त्यावर बसून आपली वेळ येण्याची प्रतीक्षा केली. काही शिक्षक अध्यक्षांच्या बंगल्याजवळील शेडमध्ये बसले होते. एकीकडे आदर्श शिक्षकांचा सत्कार करून शिक्षण विभाग स्वतःची पाठ थोपटून घेतो; तर दुसरीकडे त्याच शिक्षकांना रस्त्यावर बसण्याची वेळ येते, हा विरोधाभास संतापजनक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. शिक्षकांसाठी आवश्यक ती व्यवस्था करण्यास प्रशासन अपयशी ठरल्याने जिल्हा परिषद प्रशासनाच्या नियोजनाचा पुरता बोजवारा उडाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांसाठी किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यातही प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. दुपारच्या वेळी उन्हाचा तडाखा वाढल्याने शिक्षकांची गैरसोय आणखी वाढली. समायोजनासारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेसाठी जिल्हा परिषद प्रशासनाने योग्य नियोजन करणे अपेक्षित असताना शिक्षकांना रस्त्यावर बसण्याची वेळ येणे ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची प्रतिक्रिया काही शिक्षकांनी व्यक्त केली. दरम्यान, या प्रकाराबाबत शिक्षणाधिकारी नाईकडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## अधिकारी जाणार शाळेत

हा विभागाचा केंद्रबिंदू असून, विद्यार्थ्यांची वाचन, लेखन आणि आकलन क्षमता वाढविणे, मराठी शाळांबाबत समाजाचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये गुणवत्तेची नवी उंची गाठणे यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केला जाणार आहे.

**आदर्श उपक्रमांचा राज्यभर प्रसार**

राज्यातील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्या समाजाच्या सहभागातून उल्लेखनीय काम करीत आहेत. काही शाळांनी ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि उद्योग समूहांच्या सीएसआर निधीच्या मदतीने शाळांचा कायापालट केला आहे. अशा आदर्श उपक्रमांचा राज्यभर प्रसार केला जाणार आहे.

## भरतीने स्कॉर्पिओला दाखवला हिसका!

चाकांपर्यंत पोहोचले, तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. काही वेळातच गाडी वाळूत रुतली आणि वाढत्या भरतीमुळे ती पाण्यात अडकली.गाडी बाहेर काढण्यासाठी पर्यटकांनी प्रयत्न केले; मात्र गाडी काही हलली नाही. अखेर स्थानिक नागरिक मदतीला धावले. बैलगाडीच्या सहायाने स्कॉर्पिओ बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, या प्रयत्नात बैलगाडी दोन वेळा उलटली. त्यानंतर मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक एकत्र आले आणि तब्बल दोन तास झुंज देत गाडी किनाऱ्यावर खेचून आणली.तोपर्यंत गाडीचे मोठे नुकसान झाले होते. सुदैवाने या प्रकारात सहा पर्यटकांना कोणतीही दुखापत झाली नाही.

**सूचना धाब्यावर; प्रशासनाची कारवाई कुठे?**

माणकेश्वर-दांडा समुद्रकिनाऱ्यावर वाळूत वाहने नेऊ नयेत, असे स्थानिकांकडून वारंवार सांगितले जाते. तरीही काही अतिउत्साही पर्यटक समुद्रकिनाऱ्याला वाहनांचा ट्रॅक समजून गाड्या थेट वाळूत नेत आहेत. भरती-ओहोटीचा अंदाज नसताना समुद्राच्या इतक्या जवळ वाहन नेणे म्हणजे संकटाला निमंत्रण देण्यासारखेच आहे.आज गाडी बुडाली, उद्या एखादा जीव गेला तर जबाबदारी कोणाची? दुर्घटना घडल्यानंतर मदतीसाठी धावणाऱ्या स्थानिकांवरच सगळा भार टाकण्याऐवजी प्रशासनाने समुद्रकिनाऱ्यावर वाहनांना प्रवेश रोखण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## स्मार्ट मीटरविरोधात सोशल मीडियावरही पडसाद

असल्याच्या तक्रारींचाही शेकापने मुद्दा उपस्थित केला आहे. यापूर्वी महावितरण कार्यालयांमध्ये जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारणे, घेराव घालणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविणे, अशा माध्यमातून पक्षाने आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

'स्मार्ट मीटरची सक्ती सहन केली जाणार नाही. हा केवळ राजकीय लढा नसून सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या हिताचा प्रश्न आहे. सर्व घटकांना सोबत घेऊन हा लढा उभारला जाईल,' असा इशारा जयंत पाटील यांनी दिला आहे. अलिबागमधील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरविरोधातील आंदोलनाला सोशल मीडियावरूनही व्यापक जनसमर्थन मिळत असल्याचे चित्र आहे.

## पावसाअभावी भातशेती संकटात

शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतकरी भातशेतीवर अवलंबून आहेत. भाताचे उत्पादन कमी झाल्यास त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर होणार आहे. आधीच शेतीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि इतर खर्चात वाढ झाली असताना उत्पादन घटल्यास शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.पावसाने आणखी ओढ दिल्यास यंदाचा भातशेतीचा हंगाम शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या अडचणीचा ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे वरुणराजाने कृपादृष्टी करावी आणि भातशेतीला आवश्यक असा समाधानकारक पाऊस पडावा, अशी अपेक्षा रायगड जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

## सजावटीच्या साहित्याने बाजारपेठा सजल्या

साहित्याची मोठी उलाढाल सुरू झाली आहे. शहरातील मोठ्या दुकानांबरोबरच गावागावातील छोट्या दुकानदारांनीही गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारचे सजावटीचे साहित्य उपलब्ध झाले आहेत. लहान मोठ्या बाजारपेठांमध्ये वेगवेगळ्या वस्तू खरेदीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. दहीहंडीचा सण झाल्यावर गणेशोत्सवाच्या खरेदीला सुरुवात झाली आहे. फुलमाळ, वेलवेट तोरण, रुमाल, मोती माळ, मोती या साहित्यांसह वेगवेगळ्या तयार वस्तूंना सजावटीसाठी पसंती दर्शविली आहे. आकर्षक सजावट करण्यासाठी यावर्षीदेखील अनेकांनी पर्यावरणपुरक वस्तूंवर भर दिला आहे. कागदी मखरांसह तयार मखरलाही मागणी वाढली आहे. कागद, बांबू, कापड आणि नैसर्गिक वस्तूंचा वापर करून सजावट करणे, फुलांची आरास करणे याकडे अनेकांचा कल आहे. विशेष म्हणजे, यंदा नवीन उपक्रमावर आधारित घरगुती सजावटीकडे ग्राहकांचा कल वाढताना दिसून येत आहे. कोकणी संस्कृती, वारली कला, ग्रामीण जीवन, मंदिराची प्रतिकृती, फुलांची आरास अशा वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित सजावटीचे साहित्य बाजारात उपलब्ध झाले आहे. त्यामुळे कमी जागेतही आकर्षक सजावट करण्याचा प्रयत्न गणेशभक्तांकडून करण्यात आला आहे. पारंपरिक सजावटीसोबतच आकर्षक लाईटिंग, आर्टिफिशियल फुले, रेडिमेड बॅकड्रॉप, तोरणे, पडदे, मोत्यांच्या माळा आदी वस्तूंच्या बाजारात वेगवेगळ्या वस्तू दाखल झाल्या असल्या तरी जिल्ह्यातील भक्तांना यंदाही महागाईची झळ बसली आहे. वेगवेगळ्या वस्तूंमागे दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. या महागाईमुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. मात्र बाप्पाच्या स्वागतासाठी याकडे दुर्लक्ष करीत भक्तांचा खरेदीचा उत्साह कायमच असल्याचे दिसून आले.

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू

त्यांना उपचारासाठी परळी येथील जानकी हॉस्पिटलमध्ये नेले होते.

हॉस्पिटलमधील डॉक्टर विशाल विलास परदेशी यांनी रुग्णाचा रक्तदाब २५० पर्यंत वाढल्याचे सांगितले. त्यानंतर नर्सने त्यांना सलाईन लावून दोन इंजेक्शन्स दिली. रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास बील भरून डिस्चार्ज घेताना कुणाल पवार यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली पडले. त्यांना तात्काळ वॉर्डमध्ये नेऊन सीपीआर देण्यात आला, परंतु त्यांचा मृत्यू झाला. सदर घटनेनंतर मयत रुग्णाच्या पत्नीने डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पतीचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करत पुरवणी जबाब दिला होता. रुग्णाला हृदयविकाराचा झटका आल्याची लक्षणे (उच्च रक्तदाब आणि हाताला मुंग्या येणे) असतानाही, बीएचएमएस पदवीधारक असलेल्या डॉक्टर विशाल परदेशी यांनी योग्य त्या तपासण्या (उदा. ईसीजी) न करता किंवा तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठवण्याऐवजी रुग्णाला तीन तास हॉस्पिटलमध्येच ठेवले. तसेच डिस्चार्ज देताना बीपी तपासणी न करता हलगर्जीपणा दाखवला, असा आरोप तक्रारदारांनी केला होता.या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पाली पोलिसांनी उपचाराची कागदपत्रे आणि डॉक्टरांच्या शैक्षणिक अर्हतेची माहिती रायगड-अलिबाग येथील जिल्हा शल्यचिकित्सकांकडे अभिप्रायासाठी पाठवली होती.शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीची बैठक १८ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडली. या बैठकीत सर्व वैद्यकीय कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यात आली. या पडताळणीनंतर, मयत कुणाल पवार यांच्या उपचारादरम्यान उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, असा अधिकृत अभिप्राय तज्ज्ञ समिती आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी २ सप्टेंबर २०२६ रोजी दिला.जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अहवालानंतर, शारदा कुणाल पवार यांच्या फिर्यादीवरून ७ सप्टेंबर २०२६ रोजी पाली पोलीस ठाण्यात डॉक्टर विशाल परदेशी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या कलम १०६(१) अन्वये निष्काळजीपणामुळे मृत्यू घडवून आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अंकुश भागवत सांगळे करत आहेत.

## आज आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण

शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी दहा सप्टेंबरला होणारा हा आदर्श पुरस्कार अलिबाग तालुक्यातील सुगंधा पाटील (राजिप शाळा वाडगाव) पेणमधील रामकृष्ण भोईर (राजिप शाळा मायणी कोयना), पनवेलमधील विभावरी सिंगासने (तळोजे पाचनंद), कर्जतमधील राजेश मेचकर (राजिप शाळा मार्गाची शाळा), खालापूरमधील रुपाली पाटील (राजिप शाळा मोहोपाडा), उरणमधील शर्मिला गावंड (राजिप शाळा नवीन शेवे), सुधागडमधील स्मिता जगताप (राजिप शाळा रासळ आदिवासीवाडी), रोहामधील अमिता बामणे (राजिप शाळा रोठ खुर्द), महाडमधील संजय कोंडविलकर (राजिप शाळा कांबळे तर्फे महाड), श्रीवर्धनमधील मनोज माळवदे (राजिप शाळा बापवन), म्हसळामधील महादेव पवार (राजिप शाळा तुरूंबाडी), पोलादपूरमधील संगिता नगरकर (राजिप शाळा चांभारगणी खुर्द), माणगावमधील सरफराज कोंडविलकर (राजिप उर्दु शाळा टेमपाले), तळामधील धर्मा राणे (राजिप शाळा मालाठेवाडी), मुरूड तालुक्यातील महेंद्र सातामकर (राजिप शाळा साळाव) यांना जाहीर करण्यात आला आहे. यासोबतच पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा केळवणेचे उपशिक्षक कुमार पाटील यांना विशेष शिक्षक पुरस्कार (कला) देऊन सन्मानित केले जाणार आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर अपघात

लेलँड टेम्पो घेऊन फिर्यादी ड्रायव्हर मल्लिकार्जुन वासुदेव ढवण मुंबईकडून गोव्याकडे चालला असताना टेम्पोला धडकला. या अपघातात लेलँड टेम्पोचा ड्रायव्हर मल्लिकार्जुन ढवण हा जखमी झाला तर त्याच्यासोबतचा क्लीनर ताराचंद शिवाजी विहापूरे हा लेलँड टेम्पोचा दर्शनी भाग आयशर टेम्पोच्या मागील भागावर आढळून पूर्णपणे आत चेपला गेल्याने जागीच ठार झाला.हा अपघात झालेल्या ठिकाणी यापूर्वी देखील अनेक अपघात झालेले आहेत. या घटनेची माहिती मिळताच श्रीकाळ भैरवनाथ रेस्क्यू टिम आणि पोलादपूर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अशोक लेलँड टेम्पोचा चालक आणि क्लिनर यांना नुकसानग्रस्त टेम्पोच्या बाहेर काढण्यास सहकार्य केले. याप्रकरणी आयशर टेम्पोचा ड्रायव्हर बळीराम सोलंकी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक पवार हे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

## साक्षरतेसाठी 'उल्लास'चा जागर

प्रत्येक घटकाने साक्षरतेच्या या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षण संचालनालय संचालक कृष्णकुमार पाटील यांनी केले आहे.शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या साप्ताहिक बैठकीत निरक्षरांची नोंदणी वाढविण्याबाबत सातत्याने आढावा घेण्यात येत असून, अधिकाधिक निरक्षर नागरिकांची उल्लास ॲपवर नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील शिफारशी तसेच संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनुसार वर्ष २०३० पर्यंत सर्व तरुण आणि प्रौढ महिला-पुरुषांना साक्षरता व संख्याज्ञानाचे मूलभूत कौशल्य प्राप्त करून देण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे संचालकांनी सांगितले. या कार्यक्रमांतर्गत केवळ वाचन, लेखन आणि संख्याज्ञान एवढ्यापुरतेच शिक्षण मर्यादित न ठेवता आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्यविषयक जागरूकता, बालसंगोपन व शिक्षण, कुटुंब कल्याण, मूलभूत शिक्षण, स्थानिक रोजगाराच्या संधी तसेच पुनर्कौशल्य व उच्च कौशल्य यांसारख्या व्यावसायिक कौशल्यांवरही भर देण्यात येणार आहे.

## गणेशमूर्ती नेणाऱ्या वाहनाला धडक

मूर्ती नेणाऱ्या वाहनाला जोरदार धडक दिली. या धडकेत चार जण जखमी झाले असून गणेशमूर्तीचे देखील नुकसान झाले आहे. दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच आपत्कालीन मदत पथके आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल होत तातडीने मदतकार्य सुरु केले. घटनेत जखमी झालेल्या चौघांना वैद्यकीय उपचारांसाठी एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या जखमींची ओळख आणि त्यांची प्रकृतीबाबत अद्याप सविस्तर माहिती समोर आली नाही. तसेच ही धडक नेमकी कशामुळे झाली, हे अजून समोर आले नसून पोलीस अपघाताचा अधिक तपास करीत आहेत.

**अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**नोटीस**

दावा क्रमांक १२/२०२६

१. श्री. प्रमोद धर्मा पाटील
२. श्री. किशोर धर्मा पाटील
३. श्री. सुनिल धर्मा पाटील — वादी/अर्जदार
४. श्रीम. सुगंधा शांताराम पाटील
५. श्रीम. निर्मला धर्मा पाटील
सर्व रा.धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड

विरुद्ध

श्री. रघुनाथ गोपाळ करमरकर
रा. धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड — प्रतिवादी/सामनेवाला

**विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे**

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./ग.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे धोकवडे, ता.अलिबाग | ७०९ (जुना स.नं.१९९/०) | ०-०६-० | ०.१२ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि. १०/०८/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारीख ०८/१०/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग — सही/-
दिनांक :- ०८/०९/२०२६ — **(विक्रम पाटील)**
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
अलिबाग- रायगड

**जाहीर सुचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-१५-१० आर्स शेतजमिन मिळकत श्री. अभय दत्तात्रेय घरत व श्री. निवास गजानन घरत यांच्या सामाईक मालकीची असून, सदरील मिळकतीपैकी उत्तरेकडील ०-०७-६० आर्स शेतजमिन मिळकत श्री. अभय दत्तात्रेय घरत, राहणार ठाणे, यांच्या हिश्श्याची व निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अभय दत्तात्रेय घरत, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बागमळा, ता. अलिबाग, | १२० | ०-३७-५० ०-१४-३० पो.ख. ०-५१-८० एकूण | ०-८१ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-१५-१० आर्स शेत जमिन मिळकत श्री. अभय दत्तात्रेय घरत व श्री. निवास गजानन घरत अशा दोघांच्या सामाईक मालकीची असून, सदर जमिन मिळकतीपैकी श्री.अभय दत्तात्रेय घरत यांच्या १/२ इतक्या अविभक्त हिश्श्याची उत्तरेकडील ०-०७-६० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०९/०९/२०२६ — सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड. खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक दिलावर मेहबुब शेख रा.मु.पो. आवास ता. अलिबाग यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी बोलणी केली आहेत.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| अ.क्र. | मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र चौ.मी. | सत्ताप्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | आवास | ७६१ | ३८१.३० पैकी १९०.६५ | क |
| २ | आवास | ७५९ | २८.८० | क |

तसेच सदर मिळकतीमध्ये असलेले ग्रामपंचायत आवास घर नं. ५३१ क्षेत्र २८.४४ चौ.मी.हि घर मिळकत

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे, तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज व बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा दिलावर मेहबुब शेख हे माझे अशिलांसोबत करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वास कळविले.
अलिबाग
दिनांक ०९/०९/२०२६ — स्वाक्षरीत/-
**ॲड.जयंत ह.चेऊलकर**
२०१, सृष्टी दुसरा मजला
चुंबकीय वेधशाळेसमोर अलिबाग

**जाहीर सूचना**

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की महेश पोपटलाल वोरा यांनी आमच्या अशिलांसमवेत सर्व भारांपासून मुक्त तसेच स्पष्ट व विपणन योग्य हक्क असलेल्या खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत शेतजमीन विवरण गट क्र. १३४, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या शेतजमीनीच्या भागावर (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) हक्क मार्ग मंजुरीकरिता बोलणी केली आहेत.

कोणीही व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, मृत्यूपश्चात वारसा, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, निषेधाज्ञा, गहाण, प्रभार, न्यास, उत्तराधिकार, वारसा वा कंत्राट वा सामंजस्य करार, सुविधाधिकार, हक्क- मार्ग, ताबा, कब्जा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय उपभोग, सुविधाजनक हक्क, स्थायी व शाश्वत हक्क मार्ग आदी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद ॲन्ड कं., वकील, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे किंवा इ मेलच्या माध्यमातून <harshil.parekh@purnanand.co.in> येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १० दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आमचे अशील हे असे हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी अधित्यागित व परित्यागित आहेत असे गृहीत धरतील. पुढे, सदर सूचना कालावधीत कोणतेही दावे प्राप्त न झाल्यास, असे कोणतेही दावे नाहीत असे गृहीत धरले जाईल.

**अनुसूची**
**सदर मालमत्तेचे विवरण**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या रिक्त शेतजमीन वा भूभागाचा सर्व तो भाग व भूखंड, विवरण गट क्र. १३४, मोजमापित ० हेक्टर ४० आर ६० चौ. मी., ७/१२ उताऱ्यानुसार, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक अलिबाग यांच्या कार्यकक्षेतील व सीमा पुढीलप्रमाणे -
पूर्वेस वा त्या दिशेस : गाव कोळगावची गट क्र. १२५, १३३ व २६५ धारक जमीन.
पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव कोळगावची गट क्र. १३५ धारक जमीन.
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव कोळगावची गट क्र. १२२, १२४ व १३६ धारक जमीन.
उत्तरेस वा त्या दिशेस : गाव कोळगावची गट क्र. २६४ धारक जमीन.

दिनांक : १० सप्टेंबर, २०२६ — **पूर्णानंद ॲन्ड कं. करिता**
वकील व सॉलिसिटर्स
६५, टॅमरिंड लेन, फोर्ट चेंबर्स, सी विंग, २ रा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
ई मेल : harshil.parekh@purnanand.co.in

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, १) मेहुल बाबुलाल पारेख, २) हिमांशु बाबुलाल पारेख, दोघे रा. यांचे मालकीची व ताबेकब्जे वहिवाटीतील मौजे-कांढरोली तर्फे बोरेटी, ता.खालापुर येथील खाली सविस्तरपणे नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-कांढरोली तर्फे बोरेटी, ता. खालापुर**

| अनु.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार रु.पै. आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | २९/८/अ | ०-२०-३० | ०.४५ |
| २ | ३०/१ | ०-२४-२० | ०.६५ |
| ३ | ३०/७ | ०-०५-८० | ०.२५ |
| ४ | ३०/१० | ०-२६-७० | ०.३५ |
| ५ | ३२/२/ब | ०-०१-६० | ०.१५ |
| ६ | ३२/९ | ०-१६-३० | १.१० |
| ७ | २९/८/ब | ०-०६-०० | ०.१० |
| ८ | ३०/२ | ०-३७-४० | ०.७५ |
| ९ | ३०/९ | ०-२७-०० | ०.३५ |
| १० | ३२/३/अ | ०-१४-२० | ०.२० |
| ११ | ३२/७/अ | ०-२३-०० | ०.३५ |
| १२ | ३२/३/ब | ०-३४-७० | ०.९० |
| १३ | ३२/५/अ/१ | ०-०९-९० | १.२५ |
| १४ | ३२/२/अ | ०-११-५० | ०.७० |
| १५ | ३२/१ | ०-०९-०० | ०.१० |
| १६ | ३०/१२ | ०-०२-३० | ०.०५ |
| १७ | ३२/८/अ | ०-३९-८० | ०.५५ |
| १८ | २९/२/अ | ०-३९-०० | ०.६० |
| १९ | २९/४ | ०-१६-०० | ०.२५ |
| २० | ३०/५ | ०-०७-३० | ०.१० |
| २१ | ३०/६/ब | ०-२३-३० | ०.५० |
| २२ | ३०/६/क | ०-१८-२० | २.०० |

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. ०७/०९/२०२६ — **विरेंद्र त्रिं.कुळकर्णी**
ॲडव्होकेट, पनवेल
पत्रव्यवहाराचा पत्ता:- फ्लॅट नं. १/५०१-५०२,
नील पार्क, तालुका पोलिस स्टेशन जवळ,
ता.पनवेल, जि. रायगड. ४१० २०६,
फोन नं. ०२२३१८५०६०६

**जाहिर नोटिस**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे बहिराम कोटक, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल बाळकृष्ण यशवंत पाटील, प्रणय बाळकृष्ण पाटील, अरुण यशवंत पाटील, चेतन अरुण पाटील, गौरव अरुण पाटील यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. रामकृष्ण रघुनाथ म्हात्रे व इतर ९ यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| बहिरामकोटक | २७९ | ०.५३.१० पो. ख.०.०२.५० एकुण क्षेत्र ०.५५.६० | ७.४४ |

वरील संपुर्ण क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण — **ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
दि :- ०९/०९/२०२६ — पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल
ऑफिस आवारात, कोटआळी पेण
मो.नं ९८२२०३०३८९

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खरवंडी ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील १) मनोज बबन देशमुख यांनी १) सुरेश पांडुरंग हंकारे या विद्यमान मालका कडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २०/२/ब | ०-०५-६० गुंठे | ०-३४ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क पोटगी, लीज, चार्ज ताबा, वहिवाट अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत — आशिलातर्फे ॲडव्होकेट
१०/०९/२०२६ — **ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मो. नं ९२८४६७७५१६ — मु.पो कोंदीवडे ता कर्जत
८३९०७८९५९९ — जि. रायगड ४१०२०१

## निवडक



### नागरिकांना अशुद्ध पाणी पिण्याची वेळ

**पनवेल :** कळंबोली परिसरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून अनियमित पाणीपुरवठ्यासोबतच गढूळ आणि अशुद्ध पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करून शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने सिडकोकडे करण्यात आली आहे. याबाबत ठाकरे गटाचे कळंबोली शहर विभागप्रमुख विश्वास पेटकर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाचे सहाय्यक अभियंता प्रफुल्ल देवरे आणि प्रशांत चाहारे यांना निवेदन देण्यात आले आहे. कळंबोलीतील काही भागांत कमी दाबाने आणि अनियमित पाणीपुरवठा होत असून, त्यातच गढूळ पाणी येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. पाण्याची गुणवत्ता तपासून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळेल, यासाठी पाणीपुरवठा यंत्रणेची तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ठाकरे गटाच्यावतीने करण्यात आली. यावेळी ज्योती मोहिते, निशा जाधव, सुनिता चव्हाण, महेश गुरव, विक्रम ठाकरे, राजाराम दळवी, राजेंद्र उतेकर, रुपेश धाडवे, रुपेश ठोंबरे, बापु इथंपे आणि अशोक सानप उपस्थित होते.



### आदर्श पतसंस्थेची सुधागडात शाखा

**अलिबाग :** आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची पाली-सुधागड येथील शाखा सुरू करण्यात आली आहे. आदर्श पतसंस्थेची ही २३ वी शाखा असून, या शाखेचे उद्घाटन मंगळवारी (दि.८) ग.बा. वडेर हायस्कूल उपाध्यक्ष रवींद्र लिमये , रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्हाईस चेअरमन सुरेश खैरे व संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, पाली व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक मेहता, जनकल्याण पतसंस्था पालीचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, अष्टविनायक पतसंस्था नागोठणे अध्यक्ष विलास चौलकर, पाली व्यापारी असो. अध्यक्ष आलाप मेहता, इंदर परमार, अशोक ओसवाल, दीपक ओसवाल, प्रवीण कोठारी, राजेंद्र गांधी, सूरज शेळके, आदर्श नागरी सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील, संचालक विलाप सरतांडेल, भगवान वेटकोळी, संजय राऊत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील हे उपस्थित होते.



### मनमानी कारभाराने शेतकरी संकटग्रस्त

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील दामत येथे चित्रपट जनक दादासाहेब फाळके टाउनशिप, अनुकृती होम या मोठ्या गृहप्रकल्पाच्या कामादरम्यान लगतच्या सुपीक भातशेतीचा ताबा घेऊन तिथे बेकायदेशीरपणे कचरा, काँक्रिट आणि बांधकामाचा मलबा टाकल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. येथील सर्व्हे व गट क्रमांक १४२ मधील ४० गुंठे भातशेतीचे मालक जगन्नाथ पांडुरंग मसणे हे असून, त्यांची कोणतीही संमती न घेता विकासकाने कामगार व कंत्राटदारांच्या माध्यमातून या शेतजमिनीला डंपिंग यार्डचे स्वरूप दिले आहे. या अन्यायकारक कृत्याविरोधात बाधित शेतकऱ्याने विकासकाला कायदेशीर नोटीस बजावली आहे. शेतकऱ्याने वारंवार तोंडी विरोध दर्शवूनही बिल्डर प्रशासनाने त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. सतत मलबा साचल्याने जमिनीची नैसर्गिक सुपीकता पूर्णपणे नष्ट झाली आहे. त्यामुळे शेतकरी कुटुंबाचे वार्षिक शेती उत्पन्न बंद झाले असून, त्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.



### कापड प्रदर्शन दालनाचा शुभारंभ

**अलिबाग :** सोलापूर येथील पारंपरिक हातमाग, यंत्रमाग कापड प्रदर्शन व विक्री दालनाचे अलिबागमधील डोंगरे हॉल येथे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद कर्मचारी युनियन अध्यक्ष राजेंद्र गायकवाड, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष साईनाथ पवार, अनिल नांदगावकर, प्रवीण तुरे, काशिनाथ थळकर, संजय तवटेकर व संतोष बोंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. हे दालन दि.१ ते ३० सप्टेंबरपर्यंत सकाळी १०.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. त्यात सोलापूर येथील सुपरसिद्ध भाऊराया हॅन्डलुम यांच्याकडून हे कापड दालन खास गौरी गणपती सणानिमित्त ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

# निर्णय घ्या, नाहीतर स्वत: खरेदी करू

## माथेरानमध्ये ई-रिक्षा चालक आक्रमक

| नेरळ | प्रतिनिधी |

**माथेरान शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालवल्या जातात. तसेच, सर्व ९४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्यात याव्यात, असे देखील आदेश आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असताना देखील महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे येत्या १५ दिवसांत शासनाने निर्णय दिला नाही तर आम्ही स्वत: ई-रिक्षा खरेदी करू, असा निर्वाणीचा ईशारा हातरिक्षा चालकांनी दिला आहे.**



माथेरानमधील सर्व ९४ हातरिक्षा चालकांचे अमानवी कृतीतून मुक्तता करावी, असे आदेश फेब्रुवारीमध्ये दिले आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत होती. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने श्रमिक रिक्षा संघटना यांच्याकडून दोनवेळा आंदोलने झाली आहेत. मात्र, तरीदेखील शासनाने कोणत्याही प्रकारची आश्वासने पूर्ण केले नाही. तत्पूर्वी माथेरानमध्ये २०२२ साली पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यावेळी पायलट प्रकल्प म्हणून सात ई-रिक्षा आणण्यात आल्या हात्या. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात श्रमिक रिक्षा संघटनेकडून आवाज उठवण्यात आला होता. त्यानंतर २० ई-रिक्षांना परवानगी देण्यात आली. आज माथेरानमध्ये एकूण ३२ हातरिक्षा चालक ई-रिक्षा चालवत असून, त्यातील १२ हातरिक्षा चालक पालिकेच्या ६ ई-रिक्षा चालवत आहेत. मात्र, माथेरानमधील हातरिक्षा ओढणारे ६२ हातरिक्षा चालकांना अद्याप ई-रिक्षा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे त्यामुळे हातरिक्षा ओढणारे श्रमिक आक्रमक झाले असून, माथेरान महसूल अधीक्षक आणि नगरपरिषद मुख्याधिकारी यांना पत्र देऊन निर्वाणीचा इशारा दिला आहे. त्यात शहरात १२ हातरिक्षा चालकांना माथेरान पालिकेने आपल्या ई-रिक्षा दिल्या आहेत. त्या चालकांनी देखील स्वत:च्या मालकीची ई-रिक्षा मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, "ई-रिक्षा मिळावी म्हणून अनेक वर्षे वाट पाहणारे आता कोणतेही आंदोलन करणार नाहीत. आम्ही १५ दिवस वाट पाहणार आणि त्यांनंतर ई-रिक्षा खरेदी करणार", असा इशारा देखील दिला आहे.

### मॉनिटरिंग कमिटीकडे बोट

याबाबत माथेरान नगरपरिषदेकडून मॉनिटरिंग कमिटीकडे बोट दाखवले जात आहे. मॉनिटरिंग कमिटी सर्व ९४ हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्यास अनुकूल नसल्याचे परिषदेकडून बोलले जात आहे. त्यामुळे शासन याबाबत कोणता निर्णय घेणार, याकडे हातरिक्षा चालकांचे लक्ष लागून राहिले आहे.

### कमिटीची दादागिरी?

मॉनिटरिंग कमिटीची निवड महाराष्ट्र शासनाने केली आहे. त्या कमिटीचे सदस्य राज्य सरकारचे ऐकत नाहीत.त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन देखील महाराष्ट्र शासन हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन करीत नसल्याने नाराजी निर्माण झाली आहे.

## अरूंद रस्त्यांमुळे श्रीवर्धनकरांची कोंडी

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीवर्धन येथे विकासकामांना वेग आला असला, तरी शहरातील अरुंद रस्ते आणि वाढती वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या झाली आहे. जीवना बंदर येथील मत्स्य बंदराचे काम सुमारे ८० टक्के पूर्ण झाले असून, मुळगाव कोळीवाडा येथे बंधारा व जेट्टीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पांमुळे भविष्यात पर्यटन वाढण्याची शक्यता असताना शहरातील रस्त्यांची अपुरी रुंदी मात्र मोठा अडथळा ठरणार आहे.



शहरातील तसेच बाजारपेठेतील अंतर्गत रस्ते अवघे १० ते १२ फूट रुंदीचे आहेत. त्याच रस्त्यांवर पर्यटकांची वाहने, स्थानिकांची वाहने, मालवाहतूक वाहने तसेच बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची वर्दळ सुरू असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. गर्दीच्या वेळेत वाहनचालकांसह पादचाऱ्यांना ही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला होता. मात्र, त्यात सुमारे ७० टक्के घरे बाधित होत असल्याने स्थानिकांनी विरोध केला. त्यामुळे रुंदीकरण रखडले असून, पर्यायी 'बायपास' रस्त्याचा प्रस्तावही अद्याप कागदावरच आहे. दरम्यान, बाजारपेठेतील कोंडी कमी करण्यासाठी अनधिकृत फेरीवाले व टपरीधारकांवर कारवाई सुरू आहे. मात्र, ही कारवाई तात्पुरती मलमपट्टी ठरत असून, अरुंद रस्त्यांच्या मूळ प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय आवश्यक आहे. श्रीवर्धनमध्ये कोट्यवधींची विकासकामे होत असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाने बायपासचा प्रश्न तातडीने मार्गी लावणे गरजेचे आहे.अन्यथा वाढत्या पर्यटनाचा सर्वाधिक फटका शहराच्या वाहतूक व्यवस्थेला बसण्याची शक्यता आहे.

> "येत्या काही कालावधीमध्ये श्रीवर्धन शहरामध्ये वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्याकरिता पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात येणार असून, वाहतुकीची समस्या समूळ नष्ट करण्यात येईल. भविष्यात रस्ता रुंदीकरण जरी झाले तरी स्थानिकांना विचारत घेऊनच रस्ता रुंदीकरण करण्यात येईल. कोणावरही अन्याय न होता वाहतुकीच्या समस्येच निराकरण करण्यात येईल."
>
> – ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन

## विसर्जन घाटाची दुरवस्था



### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात

| कापोली | प्रतिनिधी |

ज्या पवित्र विसर्जन घाटावर बोर्लीपंचतन आणि कापोली परिसरातील शेकडो गणेशमूर्तींचे विसर्जन केले जायचे, तो गणपती विसर्जन घाट आज प्रशासकीय अनास्था आणि काही बेजबाबदार नागरिकांमुळे नरकयातना भोगत आहे. येथील नदीचे पाणी इतके दूषित झाले आहे की, भाविकांना बाप्पाचे विसर्जन तिथे करणे अशक्य झाले आहे. परिणामी, बोर्लीपंचतन व कापोली येथील नागरिकांना नाईलाजास्तव गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी दिवेआगर समुद्रात जावे लागत आहे.

दरम्यान, या समस्येचा सर्वाधिक फटका परिसरातील गरीब कुटुंबांना बसत आहे. आधीच सण-उत्सवाचा खर्च आणि त्यात गावाची नदी दूषित असल्याने, गरीब कुटुंबांना भाड्याने वाहने करून विसर्जनासाठी समुद्रकिनाऱ्यावर जावे लागते. त्यामुळे त्यांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागातो. तसेच, काही वर्षांपूर्वी बोर्लीपंचतनमधील तरुण गणपतीचे विसर्जन करण्यासाठी दिवेआगर समुद्रात गेले असता, समुद्राच्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे ते थेट वाहून गेले. सुदैवाने त्या तरुणांचे प्राण वाचले. त्या भीषण दुर्घटनेनंतर प्रशासनाचे डोळे उघडतील आणि गावातील विसर्जन घाटाचे संवर्धन होईल, अशी आशा होती. मात्र, आजही प्रशासनाला जाग आलेली नाही. जर या विसर्जन घाटाची स्वच्छता झाली, तर पुन्हा पूर्वीप्रमाणेच या पुलाशेजारी बाप्पाचे विसर्जन करता येईल. त्यामुळे गरीब जनतेचा नाहक होणारा त्रास, वेळ आणि आर्थिक भूर्दंड वाचू शकेल, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

## 'बाप्पाला घरी आणायचे कसे?'

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील बोरमाच येथील ग्रामस्थ गेल्या महिनाभरापासून अक्षरशः वाहतुकीविना तडफडत आहेत. मुसळधार पावसामुळे डोंगराचा मोठ्या प्रमाणात मातीचा भराव रस्त्यावर आल्याने गावाकडे जाणारा वाहतुकीचा मार्ग बंद झाला आहे. मात्र, महिना उलटूनही या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे अपेक्षित लक्ष गेलेले नाही. काही दिवसांवर गौरी-गणपतीचा सण येऊन ठेपला आहे. त्यामुळे "बाप्पाला घरी आणायचे कसे?" असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तसेच, मुंबई, पुणे तसेच अन्य शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त राहणारे अनेक चाकरमानी आपल्या गावाकडे येणार आहेत. मात्र, गावात पोहोचायचे कसे, हा प्रश्न देखील त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

बोरमाच गावातील नागरिकांसाठी हा केवळ रस्ता बंद होण्याचा प्रश्न राहिलेला नसून दैनंदिन जीवन, रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सण-उत्सव यांच्याशी जोडलेले मोठे संकट निर्माण झाले आहे. रस्ता बंद असल्याने वाहनांची ये-जा ठप्प झाली असून, ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ज्या गावात चाकरमानी वर्षभर गणपतीची आतुरतेने वाट पाहतात, त्याच गावाचा रस्ता महिनाभर बंद असणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. त्यामुळे "गणपती बाप्पा घरी आणायचा कसा?" असा सवाल ग्रामस्थ आणि चाकरमानी उपस्थित करीत आहेत. दरम्यान, बोरमाच गावातील रस्ता बंद झाल्याची गंभीर बाब डॉ. मोहन दोशी यांनी खासदार सुनील तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. संबंधितांना परिस्थितीची माहिती देऊनही अद्याप प्रत्यक्षात रस्ता खुला करण्यासाठी अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

## माणगाव बाजारपेठ 'नो पार्किंग' झोन

**माणगाव :** गणेशोत्सव काळात गणेश भक्तांना कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ नये आणि त्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी माणगाव पोलीस सज्ज झाले आहेत. पोलिसांनी बाजारपेठ आणि मुंबई-गोवा महामार्गावर नो पार्किंग केले आहे. जे नियम आणि कायदे मोडतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल, अशी घोषणा करण्यात आली आहे. वाहन पार्किंग करण्यासाठी नविन नगर पंचायतीच्या मागील उतेखोल शाळा पटांगण, जूनी पंचायत समिती मैदान, एसटी बस स्थानकाचे आवार आदी मोकळ्या जागेत पार्किंगची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवार दि.८ सप्टेंबर रोजी सकाळपासून महामार्ग आणि बाजारपेठेत बेकायदा वाहने पार्क करणार्यावर धडक दंडात्मक कारवाई करण्यात आली. सर्वांना जाणीव आणि जागृती निर्माण करण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. त्यात दोषींवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

## माणगावात वाहतुकीला नवे नियोजन

**माणगाव :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात दाखल होणाऱ्या लाखो चाकरमान्यांच्या प्रवासाचा विचार करून माणगाव पोलिसांकडून वाहतूक व्यवस्थेबाबत विशेष नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात माणगाव पोलीस ठाण्याच्यावतीने आयोजित बैठकीत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. त्यात मुंबई आणि पुण्याकडून येणाऱ्या एसटी बस यंदा माणगाव शहराच्या बसस्थानकात प्रवेश करणार नाहीत. माणगावच्या पुढे बायपासजवळ एसटी बससाठी तात्पुरता बसथांबा उभारण्यात येणार आहे. येथून प्रवाशांना पायी अथवा रिक्षाने माणगावच्या बसस्थानक परिसरात यावे लागणार आहे.

## नवी मुंबईतील भूखंडांचा विमानशास्त्रीय अभ्यास

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर येथील विविध भूखंडांच्या विकासाचे नियोजन करताना विमान वाहतुकीशी संबंधित तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी सिडकोने सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. नवी मुंबईतील विविध भूखंडांसाठी विमानशास्त्रीय अभ्यास (एरोनॉटिकल स्टडी) करण्यासाठी सिडकोच्या नियोजन विभागाने निविदा प्रसिद्ध केली आहे. निविदेचे काम नवी मुंबईतील विविध भूखंडांसाठी एरोनॉटिकल स्टडी करणे असे नमूद करण्यात आले आहे. सल्लागाराची नियुक्ती एकरकमी करार पद्धतीने करण्यात येणार असून, कामाचा कालावधी ४९ दिवसांचा आहे. तसेच, निविदेसाठी १ लाख रुपयांची अनामत रक्कम निश्चित करण्यात आली आहे. नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित होत असताना विमानतळाच्या परिसरातील जमिनींच्या भविष्यातील विकासासाठी विमान वाहतुकीशी संबंधित तांत्रिक निकष महत्त्वाचे ठरणार आहेत.


**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई - 400074
CIN-L24110MH1978GOI020185
नवरत्न कंपनी

जाहिरात क्र.01072026

**ट्रॉम्बे / थळ युनिट / विभागीय कार्यालयांसाठी संपूर्ण भारतात भरती**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी 'नवरत्न' कंपनी आहे, ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे रु. 18690.90 कोटी आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्याचे उत्पादन युनिट महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे :

| अनु. क्र. | पद कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | EOASSTSEC/ 072026 | सहायक अधिकारी (सचिवीय) E0 श्रेणी | 10 |

इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी कंपनीची वेबसाइट **www.rcfltd.com** वरील 'रिक्रूटमेंट' सेक्शन पहावे.

**कार्यकारी संचालक (मा. सं.)**

समृद्धीची एकत्र वाटचाल







**मिडीयाचा आधार घेत लागवड | अलिबाग परिसरात शेकडो किलो वांग्याची विक्री**

## कार्लेतील शेतकऱ्याचा अनोखा प्रयोग

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पांढरा कांदा उत्पादक म्हणून प्रसिद्ध असलेल्या अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील सतिश म्हात्रे या शेतकऱ्याने भर पावसाळ्यात अनोखा शेती प्रयोग केला आहे. त्यांनी यूट्यूब मिडीयाच्या मदतीने पाण्याच्या पारदर्शक जारमध्ये वांग्याची लागवड केली आहे. त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे त्यांचा हा अनोखा प्रयोग यशस्वी झाल्याचे सतिश म्हात्रे यांनी सांगितले.



अलिबागमधील कार्ले येथील सतिश म्हात्रे या शेतकऱ्याने मोबाईलच्या सहाय्याने आणि युट्यूब मिडीयाच्या मदतीने भातशेतीव्यतिरिक्त अन्य पिकांची लागवड करून एक वेगळा प्रयोग केला आहे. त्यांनी युट्यूब मिडीयावरून लागवड व फवारणी विषयक माहिती संकलीत केली आणि हा प्रयोग त्यांच्या शेतामध्ये करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी वांग्याची लागवड करण्याचा निर्णय घेतला. जूनच्या पहिल्या आठवड्यात तीन गुंठे क्षेत्रामध्ये वांग्याची लागवड केली. ही लागवड पाण्याच्या पारदर्शक जारमध्ये करून एक अनोखा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांचा हा प्रयोग यशस्वीदेखील ठरला. यामध्ये सतिश म्हात्रे यांना त्यांच्या पत्नीची साथ मोलाची ठरली. पांढरा कांदा उत्पादक शेतकरी म्हणून ओळख असलेले सतिश म्हात्रे हे गेल्या अनेक वर्षांपासून भातशेतीसह इतर पिकांची लागवड करीत आहेत.

> "आता वांग्याची रोपे मोठी झाली असून, त्या रोपांना वांगी आली आहेत. ही वांगी बाजारात विक्रीसाठीदेखील पाठविण्यास सुरुवात केली आहे. अलिबागसह आजूबाजूच्या स्थानिक बाजारात आतापर्यंत दीडशेहून अधिक किलो वांगी विकली गेली असून, या वांगीतून चांगले उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या सल्ल्यासह युट्यूब मिडीयाच्या मदतीने चांगल्या उत्पादनाच्या पिकांची लागवड करता येते."
>
> – सतिश म्हात्रे, शेतकरी, कार्ले

# दुष्काळाच्या सावल्या

यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी असणार हे आधीपासून दिसत होतेच. आता त्याचा अनुभव येऊ लागला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून राज्याच्या बहुतांश भागात पाऊस गायब आहे. एरवी भरपूर वृष्टी होणाऱ्या कोकणातही यंदा म्हणावा असा पाऊस झालेला नाही. सध्या तर ऑक्टोबर हीटसारखा उन्हाळा जाणवू लागला आहे. मराठवाड्यामध्ये धरणांमध्ये जेमतेम २५ टक्के पाणी आहे. सीना कोळेगावसारख्या धरणात शून्य पाणीसाठा आहे. म्हणजे जलाशय कोरडा आहे. पश्चिम महाराष्ट्रात कोयना धरण भरले आहे. किंवा मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांची स्थिती बरी आहे. पण बाकी इतरत्र ठणठणाट आहे. शिवाय सप्टेंबरमध्ये पाऊस झाला नाही तर मुंबई किंवा पश्चिम महाराष्ट्रातील जनतेवरही येत्या उन्हाळ्यात पाणीसंकट येऊ शकेल. पुण्यामध्ये ऐन पावसाळ्यात पाणीकपात चालू ठेवावी लागली होती. मुंबईतील दहा टक्के कपात चालू आहेच. राज्यातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून नळाला एक-दोन वेळाच पाणी येते. राज्य सरकारच्या माहितीनुसार, राज्यातील १९ जिल्ह्यांमधील ८३ तालुक्यांमध्ये वीस दिवसांहून अधिक काळ पाऊस झालेला नाही. म्हणजेच त्यात खंड पडला आहे. दुष्काळासाठी सरकारने जे मापदंड निश्चित केले आहेत त्यानुसार, एकवीस दिवसांचा खंड पडल्यानंतर अवर्षणाची स्थिती जाहीर करून मदत करावी लागते. उत्तर महाराष्ट्रातील नगर, नाशिक, धुळे व नंदूरबार जिल्ह्यांमध्ये ३१ दिवसांहून अधिक खंड पडला आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि नगर जिल्ह्यातील कर्जत येथे तर तब्बल ३८ दिवस, म्हणजे एक महिन्याहूनही अधिक काळ पाऊस झालेला नाही. हा भाग एरवीही दुष्काळी म्हणून गणला जात असला तरी यंदाचे चित्र भयंकर आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार २३ तालुक्यांमध्ये महिनाभराहून अधिक तर ४२ तालुक्यांमध्ये २० ते २५ दिवस इतका पावसाचा खंड पडला आहे. या बहुतांश ठिकाणी खरिपाच्या पेरण्या झालेल्या नाहीत किंवा झाल्या असल्या तर आता पाऊसच नसल्याने त्या वाया गेल्या आहेत. जे सर्वस्वी शेतीवर अवलंबून आहेत त्यांच्यासाठी खरिपाचा एक हंगाम पूर्ण कोरडा जाणे आणि त्यासाठी केलेला खर्च बुडित खाती जाणे हे भयंकर आहे. असे शेतकरी कर्जाच्या खाईत लोटले जाण्याचा धोका आहे.

## कर्नाटकाचा धडा

शेजारील कर्नाटक सरकारने याबाबत तातडीने दुष्काळ जाहीर केला व केंद्र सरकारकडे मदतीची मागणी केली. फडणवीस आणि मंडळी बहुदा सप्टेंबरमध्ये पाऊस पडेल अशा हवाल्यावर विसंबून असावीत. काल मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळावर चिंता व्यक्त करण्यात आली. पण त्यावर उपाय मात्र केले गेले नाहीत. राज्यात सध्या मुंबई, पुणे, ठाणे आणि नाशिक या शहरी विभागाचे वर्चस्व आहे. तेथील गणपती उत्सवात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार आहे. बिल्डर तसेच व्यापारी मंडळींना सणासुदीचा फायदा उठवायचा आहे. त्यांच्या फायद्यावर आणि आनंदावर विरजण पडू नये म्हणून बहुदा दुष्काळावर बोलण्याचे देखील टाळले जात आहे. शेतकरी आणि सामान्य जनता यांना या कारभारात शून्य किंमत आहे. दुर्दैवाने ही जनता देखील आपले पोटाचे प्रश्न विसरून भलत्याच गोष्टींच्या मागे धावत असते. आता मराठवाड्यातील धीरज देशमुख किंवा नगरचे रोहित पवार अशा आमदारांनी मुख्यमंत्र्यांना पत्रे लिहून दुष्काळ जाहीर करण्याची कारवाई सुरू करण्याची मागणी केली आहे. जिल्हा व तालुका स्तरावर पीक नुकसानीचे पंचनामे करून आवश्यक त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करावा, बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा करावेत, शेती कर्जांचे पुनर्गठन करून व्याज माफ करावे आणि संकट काळात सुरू असलेली सक्तीची कर्जवसुली स्थगित करावी अशा मागण्या पुढे येत आहेत. राज्य सरकारला आज ना उद्या त्या मान्य कराव्याच लागतील व जेव्हा निर्णय घेतला जाईल तेव्हा आम्हीच कसे शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून जाहिरात केली जाईल. पण महत्व वेळेला आहे. शिवाय केलेल्या उपायांची अंमलबजावणी त्वरीत व्हावी लागेल. सर्वसाधारण अनुभव असा आहे की, नोकरशाही प्रत्येक टप्प्यावर यात खोडे घालते. म्हणून तर पी साईनाथ यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकारांनी दुष्काळ आवडे सर्वांना असे इंग्रजी पुस्तक लिहिले. आजवरच्या सर्व दुष्काळांमध्ये त्याचा अनुभव आलेला आहे.


## पिण्याच्या पाण्याचा सवाल

राज्य सरकारने काही महिन्यांपूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली.त्यात बऱ्याच अटीशर्ती घालण्यात आल्या. त्यामुळे त्याचा फायदा नेमक्या कोणाला झाला हे अजून स्पष्ट झालेले नाही. बहुतेकदा सरकारी नोकरशाहीशी संधान असलेल्या तसेच राजकीय नेत्यांच्या जवळच्या लोकांनाच असल्या योजनांमधून पैसे किंवा सवलती मिळत असतात. आता ती माफी होत नाही तोच दुष्काळ समोर येऊन ठेपला आहे. त्यामुळे हेच सगळे लाभार्थी सरकारकडून पैसे मिळवण्याच्या योजना आखू लागले असतील. त्यांना बाजूला ठेवणे आणि खऱ्या गरजूंना याचा लाभ देणे हे फडणवीस सरकार घडवू शकते का ही मुख्य कसोटी असेल. गेल्या कित्येक वर्षात आलेला नाही असा दुष्काळ यंदा भेडसावण्याची शक्यता आहे. सुदैवाने देशातले धान्यसाठे भरलेले आहेत. १९७२ च्या दुष्काळात लोकांवर भूकबळी पडून मरण्याची वेळ आली होती. तसे आता होणार नाही. सरकार रेशनवर बहुतांश गरीब लोकांना फुकट धान्य देत आहेच. त्याची व्याप्ती कदाचित वाढवावी लागेल. खरा प्रश्न पिण्याच्या पाण्याचा, गुरांच्या चाऱ्याचा व या गुरांना जगवण्याचा येईल. पिण्याचे पाणी नसेल तर मराठवाडा व विदर्भातून खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर होण्याची शक्यता आहे. मात्र आपली सर्वच शहरे गर्दीने व त्यांच्या अडचणींच्या भाराने वाकलेली आहेत. त्यामुळे सरकारला याचे नियोजन करावे लागेल. ग्रामीण भागामध्ये मनरेगा किंवा रोजगार हमीमधून चांगला रोजगार निर्माण करता येतो. पण या सरकारने मनरेगासाठीच्या अटी विचित्र करून ठेवल्या आहेत. त्यामुळे यंदापासून मनरेगाच्या निधी व कामांमध्ये कपात झाली आहे. नरेंद्र मोदी यांना तर ही योजना म्हणजे काँग्रेसच्या पापांचे स्मारक वाटते. पण याच योजनेने कोरोना काळात मोदींना तारले हे ते सांगत नाहीत. असो. याच दरम्यान सरकार मुंबई किंवा पुण्यासारख्या शहरांना वाट्टेल त्या रीतीने वाढू देत आहे. मुंबईमध्ये भारतातील सर्वाधिक डेटा सेंटर्स उभी राहिली आहेत. या सेंटरमध्ये सर्व्हर्स थंड करण्यासाठी वातानुकूलन यंत्रणा गरजेची असते. त्यासाठी प्रचंड प्रमाणात पाणी लागते. सबब अमेरिकेपासून सर्वत्र त्यांना विरोध होतो आहे. भारतात मोदी, फडणवीस आणि मंडळी त्यांना पायघड्या घालत असतात. नवी मुंबई आणि ठाण्यातही डेटा सेंटर्स उभारली जात आहे. त्यासाठी रायगड आणि पालघर जिल्ह्याचे पाणी पळवले जात आहे. रायगडच्या बाळगंगा धरणावर यांचा डोळा आहे. एरवी या प्रश्नाचे गांभीर्य लोकांना जाणवत नाही. आता कमी पाऊस किंवा दुष्काळाचा परिस्थितीत तरी अदानीसारख्या भांडवलदरांना पाठीशी घालू नये. कधी तरी, सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय व्हावेत.

**| विचार**

# अधिवेशन आणि अपेक्षाभंग

*संसदेचे एक मौल्यवान अधिवेशन अलिकडेच वाया गेले. संसद किंवा विधिमंडळाचे सभागृह हे संवादाचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. पण सरकार आणि विरोधी पक्षात संवादच नसेल तर कामकाज कसे होणार? जनतेच्या संवेदनशील मुद्द्यावर उत्तरदायित्व कोणाचे हेच निश्चित नसेल तर सामान्य जनतेचे अत्यंत महत्वाचे प्रश्न मार्गी कोण लावणार? संसदेच्या पावसाळी अधिवेशनाने जुन्या पण महत्वाच्या मुद्द्यांना हात घातला. त्या निमित्ताने.*



**डॉ.सुकृत खांडेकर**

जनतेच्या नानाविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचे, त्या निमित्ताने विधेयके संमत करण्याचे संसद हे अत्यंत महत्वाचे माध्यम आहे. म्हणूनच त्याला लोकशाहीचे मंदीर अशी उपमा दिली जाते. प्रत्यक्षात मात्र याची जाणीव राजकारण्यांना नसल्याचे अलिकडेच पार पडलेल्या संसद अधिवेशनानिमित्त पहायला मिळाले. संसदेचे पावसाळी अधिवेशन गोंधळ, गदारोळ आणि सरकारविरोधी घोषणांमध्ये वाहून गेले. विरोधी पक्षांनी वारंवार मागणी करून, घोषणा देऊनही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सभागृहाकडे फिरकले नाहीत. 'अमित शहा माफी मांगो' आणि 'राहुल गांधी भागो मत' अशा घोषणायुध्दात पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले. संसदेच्या अधिवेशनातून देशातील जनतेला काय मिळाले तर 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताचा अवमान झाला तर तुरूंगवासाची शिक्षा करणारा कायदा संमत झाला. केरळचे केरळम असे नामांतर झाले. गोंधळ-गदारोळात चर्चा न होता सरकारने मांडलेली बारा विधेयके मंजुर झाली. संसदेच्या अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांवर, विधेयकांवर चर्चा होणार नसेल आणि विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी पंतप्रधान किंवा गृहमंत्री सभागृहात येणारच नसतील तर अधिवेशनाचा उपयोग काय? आम्हाला थेट प्रश्न विचारणारे तुम्ही कोण, अशी सरकारची मानसिकता असेल तर विरोधी पक्षांनी कितीही आदळआपट केली तरी ती व्यर्थ ठरणार आहे.

संसदीय लोकशाही पध्दती असणारा भारत हा जगातील सर्वात मोठा देश आहे. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा संसद भवनात आले तेव्हा लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराच्या पायऱ्यांवर नतमस्तक होऊन वंदन केले होते. आपण देशाचे प्रधान सेवक असल्याचे त्यांनी जाहीरपणे सांगितले होते. सत्तास्थापनेसाठी जनतेने भाजपाला निवडून दिले आहे तसेच विरोधी बाकांवर बसून जनतेचा आवाज उठवण्यासाठी काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), नॅशनल कॉन्फरन्स, राजद, द्रमुक आदी पक्षांना भाजपाच्या विरोधात निवडून दिले आहे. अहंकार आणि दुस्वास यामुळे सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात समन्वय राहिलेला नाही. पावसाळी अधिवेशनानंतर या दोन बाजुंमध्ये कटुता वाढली आहे. दोन्ही बाजुंचे आयटी सेल ही कटुता आणखी कशी वाढेल आणि जनतेत एकमेकांची बदनामी कशी होईल यासाठी अहोरात्र सक्रिय असतात. यातून जनतेचा काय फायदा? संसदीय कामकाजात सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांचा आदर राखणे महत्वाचे असते. संसदीय कामकाजात प्रत्येक मिनिट मोलाचे आहे, याचे भान दोन्ही बाजुने राखले पाहिजे. प्रत्यक्षात तसे घडत नाही. संसदेचे कामकाज चालवण्याची जबाबदारी सरकारची आहे, असे भाजपाने विरोधी पक्षात असताना अनेकदा ठणकावून सांगितले आहे. बोफोर्स, कोळसा घोटाळा किंवा स्पेक्ट्रम टू जी घोटाळ्यावरून संपूर्ण अधिवेशन ठप्प करण्याची किमया भाजपाने विरोधी पक्षात असताना करून दाखवली आहे. युध्दात शहीद झालेल्या जवानांसाठी मागविण्यात आलेल्या कॉफिनमधे घोटाळा झाल्याचा आरोप करून अनेक दिवस संसदेचे कामकाज ठप्प केल्याचा पराक्रमही भाजपाने करून दाखवला होता.

आता भाजपा सत्तेत आहे. जंतरमंतरवर झालेल्या जेन झी आंदोलनातील विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश पोलिसांना कुणी दिले असा थेट सवाल काँग्रेसने विचारला आहे. लोकसभेत राहुल गांधी, प्रियांका गांधी वड्रा, समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव तसेच दुसरीकडे राज्यसभेत म ल्लिकार्जून खरगे यांनी हाच प्रश्न विचारून सरकारला घाम फोडला. विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचा आदेश आपण गृहमंत्री म्हणून दिला असे सांगितले तरी अमित शहा अडचणीत येतात आणि असा आदेश आम्ही दिलेला नाही असे म्हटले तर दिल्ली पोलिसांवर त्यांचे नियंत्रण नाही का, या प्रश्नामुळे पुन्हा तेच कोंडीत सापडतात. दिल्ली पोलीस केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या आदेशाशिवाय दिल्ली पोलिसांचे पानही हलत नाही. त्यामुळेच अमित शहा संसदेच्या दोन्ही सभागहांमध्ये वीस जुलैनंतर फिरकले नसावेत. मोदी- शहा सभागृहात आल्याशिवाय आम्ही कामकाज चालू देणार नाही, हा हेका विरोधी पक्षाने शेवटपर्यंत कायम ठेवला. सरकारमधील दोन्ही सर्वो च्च नेते संसद भवनात आपल्या कार्यालयात रोज येत होते पण वीस जुलैच्या लाठीमार, अश्रुधूर आणि (पॅलेट गन्स) गोळीबाराच्या घटनेपासून सभागृहात फिरकलेच नाहीत. तेरा ऑगस्टला सभागृहात आले ते वंदे मातरम ऐकण्यासाठीच. आपण सदनात येऊन चर्चेला उत्तर देणार असे अमित शहा यांनी पत्रकारांना सांगितले होते. मात्र ते आले, वंदेमातरम झाले आणि सभागृहाचे काम काज अनिश्चित काळापर्यंत स्थगित झाल्याचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी जाहीर केले. हे सर्व अचानक आणि अनपेक्षितपणे घडले. विद्यार्थ्यांवर गोळीबार, लाठीमार करण्याचे आदेश कुणी दिले याचे उत्तर या अधिवेशनात मिळू शकले नाही.

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला संसदेचे पावसाळी अधिवेशन जनतेच्या पदरी निराशा टाकून देऊन संपवले गेले. अधिवेशनात आरोप-प्रत्यारोप होतात, एकमेकांवर कुरघोडी केली जाते, परस्परांना खिजवणाऱ्या घोषणा होतात, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष एकमेकांचा अवमान करतात हे मान्य केले तरी कामकाजच न होणे अतिशय गंभीर आहे. लोकसभा आणि राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला लेखी पुस्तिकेत रोज चारशे तरी प्रश्न तरी असतात. प्रश्नोत्तराचा तास ही सरकारची कसोटी असते. सरकारला धारेवर धरण्याचे हे प्रमुख हत्यार असते. पण अधिवेशनात या तासाची चर्चाच झाली नाही, हे मोठे दुर्दैव आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत जेमतेम १७ टक्के तर राज्यसभेत ३७ टक्के कामकाज झाले. हे मुळीच भूषणावह नाही. संसद भवन ही काही दगड विटांची इमारत नाही; सर्व देशातील भावभावनांचे प्रतिबिंब लोकशाहीच्या सर्वोच्च सदनात पडले पाहिजे. रोज संसद ठप्प होत असूनही पंतप्रधान व गृहमंत्री फिरकले नाहीत, यातून सरकार काय संदेश देऊ इच्छिते? संसदीय कामकाज मंत्री विरोधी पक्षाला आवाहन करण्यापलिकडे काय करू शकतात? त्यांना स्वातंत्र्य आणि अधिकार किती आहेत? सरकारच्या वतीने ते काही ठोस आश्वासन तरी देऊ शकतात का? पंतप्रधान किंवा गृहमंत्री यांना सभागृहात या असे म्हणू शकतात का? लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभेचे सभापतीही पंतप्रधान किंवा गृहमंत्र्यांना संसदेच्या सदनात हजर राहण्यासंबंधी निर्देश देऊ शकत नाहीत. दोन्ही सर्वोच्च नेते सदनात येत नाहीत आणि विरोधी पक्ष कामकाज चालू देत नाहीत, यातूनच मोठा पेच निर्माण झाला. संसद किंवा विधिमंडळाचे सभागृह हे संवादाचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. पण सरकार आणि विरोधी पक्षात संवादच नसेल तर कामकाज कसे होणार? जनतेच्या संवेदनशील मुद्यावर उत्तरदायित्व कोणाचे हेच निश्चित नसेल तर विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश कुणी दिले हे कसे समजणार? संसदेच्या पावसाळी अधिवेशनात काँग्रेस आक्रमक होती तर सरकार बचावात्मक दिसले. नीट पेपरफुटीचे खापर धर्मेद्र प्रधानांवर फोडले गेले त्यांनी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून राजीनामा दिला. विरोधी पक्षाचे पुढचे टार्गेट अमित शहा होते, ते साध्य झाले नाही. पण ते वीस जुलै ते बारा ऑगस्ट या काळात सदनाकडे फिरकलेच नाहीत ही काही चाणक्यानिती नव्हे. भाजपाचे संस्थापक, उत्तुंग नेते, दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणत, जो देश की सरकार को सवाल पूछ नहीं सकता, वो देशप्रेमी नही, सत्ताप्रेमी होता है... ताज्या गदारोळानंतर त्यांचे हे उदगार आठवतात. येत्या काळात त्यांचे हे उदगार सर्व पक्षियांनी लक्षात ठेवायला हवेत आणि हेत्वारोपांपेक्षा संसद चालवणे अधिक महत्वाचे आहे, हे मान्य केले पाहिजे.

**| चर्चा आजची**

# टोलमाफी झाली, पण जीवघेणा प्रवास सुरूच



**संतोष राऊळ**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा उत्सव कोकणात मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. त्यासाठी मुंबई-पुणेसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून चाकरमानी कोकणातील आपआपल्या गावी येत असतात. येताना ते खासगी वाहनांसह लालपरीचा अवलंब करतात. नुकतेच राज्य सरकारने चाकरमानी आणि गणेशभक्तांसाठी मोठी खुशखबर दिली आहे. गणेशोत्सव काळात खासगी वाहनांसह एसटी बसेसनाही टोलमाफी देण्यात आली आहे. दि. ११ ते २७ सप्टेंबरदरम्यान मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-बंगळुरू महामार्ग आणि अटल सेतूवर ही सवलत लागू करण्यात आली आहे. त्यामुळे गावाकडे जाणाऱ्या गणेशक्तांच्या प्रवासवर्गात आणखी बचत होणार असून, चाकरमान्यांमध्ये काहीसे आनंदाचे वातावरण आहे. परंतु टोलमाफी झाली, पण खड्डेमुक्त, दरडमुक्त, अपघातमुक्त अन् इतर समस्यामुक्त महामार्ग कधी होणार? असा सवाल चाकरमान्यांसह स्थानिकांमधून सरकारला विचारला जात आहे.

गणेशोत्सव संपुर्ण महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. खासकरून कोकणातील गणेशोत्सव आजही पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. गणेशोत्सवादरम्यान कामानिमित्त मुंबई-पुणेसह इतर शहरी भागांत गेलेले चाकरमानी गावाकडे येत असतात. बहुतांश चाकरमानी हे रस्ता मार्गावरून प्रवास करतात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आदल्या दिवसापासून ते अनंत चतुदर्शीचे गणपती जाईपर्यंत महामार्गांवर वाहनांची प्रचंड वर्दळ असते. काही चाकरमानी आपली खासगी दुचाकी, चारचाकी घेऊन येत असतात, तर काही जणं खासगी बस किंवा एसटी बसने प्रवास करतात. आधिच महागाईने डोके वर केले आहे. त्यात पेट्रोल, डिझेल महागले असून, महामार्गावरील टोलमूळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी नुकतीच टोलमुक्तीची घोषणा केली. त्यात अटल सेतूसह मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई-बंगळूरू महामार्गाचा समावेश आहे. या सवलतीचा फायदा घेण्यासाठी संबंधित वाहनचालकांनी 'गणेशोत्सव २०२६ कोकण दर्शन' हा विशेष पास किंवा चिकटपट्टी लावणे आवश्यक आहे. त्यावर वाहनाचा नोंदणी क्रमांक आणि चालकाचे नाव नमूद केले जाणार आहे. हा पास गणेशभक्तांना जवळचे पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौकी आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयात उपलब्ध करून दिला जाणार आहे. विशेष म्हणजे, परतीच्या प्रवासासाठीही हाच पास ग्राह्य धरला जाणार आहे. तसेच, कोकणात जाणाऱ्या एसटी बसेसनाही पथकरातून सवलत देण्यात आली आहे. दि. ११ ते २७ सप्टेंबरदरम्यान ही सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे गावाकडे जाणाऱ्या गणेशक्तांच्या प्रवासवर्गात आणखी बचत होणार असून, चाकरमान्यांमध्ये काहीसे आनंदाचे वातावरण आहे. परंतु टोलमाफी झाली, पण खड्डेमुक्त, दरडमुक्त, अपघातमुक्त अन् इतर जीवघेण्या समस्यामुक्त महामार्ग कधी होणार? असा सवाल चाकरमान्यांसह स्थानिकांमधून सरकारला विचारला जात आहे. मुंबई-गोवा या महामार्गाला कोकणाला जोडणारा महत्त्वाचा दुवा समजला जातो. मात्र, या महामार्गाचे काम गेल्या १७ वर्षांपासून सुरू असून, अद्यापही पुर्णत्वास गेलेले नाही. गेल्या काही वर्षांपासून सरकारकडून गणेशोत्सवाआधी या महामार्गाची कामे पुर्ण करण्याची डेडलाईन दिली जात आहे. असे कित्तेक गणेशोत्सव गेले. परंतु, मुंबई-गोवा महामार्ग पुर्ण होण्याचे नाव काही घेत नाही. अद्यापही या मार्गावर कामे सुरूच आहेत. बहुतांश उड्डाणपुले अजूनही अपूर्ण आहेत. त्याच्या कामामुळे सर्व्हिस रोडची दयनिय अवस्था झाली आहे. आणि ज्या उड्डाणपुलांची कामे पुर्ण झालीत त्या पुलांना देखील तडे जाऊ लागले आहेत. नुकताच नागोठणे येथील उड्डाण पुलाला तडे गेल्याचा व काही भाग फुगीर झाल्याचे समोर आले आहे. आता गणेशोत्सव काळात वाहनांची प्रचंड वर्दळ वाढणार आहे. त्यामुळे चाकरमान्यांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागणार हे नक्की.

तसेच, सध्या पावसाने काही प्रमाणात विश्रांती घेतली. जर पावसाळ्यात जोर धरला तर या मार्गावरील खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघात होण्याची भीती वर्तविली जात आहे. जरी हे खड्डे बुंजविले तरी पावसाच्या पहिल्याच सरीत पुन्हा उघडे पडतात. तसेच, पावसाळ्यात मुंबई-गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणात दरड कोसळत असते. तसेच, घाट रस्त्यात अपघात देखील होत असतात. त्याचबरोबर ५ ते १० तासांच्या प्रवासादरम्यान या मार्गावर कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. ज्या आहेत त्या रात्रीच्या सुमारास मिळत नाही. त्यामुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या दिवसांत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासाचे तासही वाढतात. अशा अनेक चाकरमान्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे सरकारने टोलमाफी करून काही प्रमाणात आर्थिक भार कमी केला, पण चाकरमान्यांचा जीव अद्याप टांगणीलाच ठेवला आहे. टोलमाफी जेवढी गरजेची होती त्यापेक्षा जास्त मुंबई-गोवा महामार्ग सुस्थितीत असणे गरजेचे आहे. परंतु, याकडे सरकार का दुर्लक्ष करत आहे? तसेच, टोलमाफीमुळे वाहनांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे. त्यामुळे चाकरमान्यांना यंदाही जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागणार आहे.

**लोकसंसद**

## अस्खलित मराठीत बोलणे म्हणजे आश्चर्याची बाब?

गणेशोत्सवातील डीजेमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणासारख्या सामाजिक मुद्द्यावर आवाज उठविणारे पुण्याचे विद्यानंद बापट हे त्यांच्या अस्खलित, शुद्ध मराठी भाषेमुळे आणि संस्कृत सुभाषितांच्या अचूक वापरामुळे वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडियावर सध्या खूप चर्चेत आहेत. अनेकांनी त्यांचे यासाठी आश्चर्यमिश्रित कौतुक केले आहे. खरे तर वरवर पाहता अस्खलित मराठीत बोलणाऱ्यांचे हे कौतुक वाटत असले तरी गांभीर्याने विचार केल्यास ही कौतुकाची नाही तर चिंतेची बाब आहे. एखाद्याने आपल्याच मातृभाषेत प्रभावीपणे बोलणे हे आश्चर्य ठरावे, हे आपल्या भाषिक अधोगतीचे लक्षण म्हणावे लागेल. आज इंग्रजी माध्यमाच्या प्रभावामुळे आणि 'कॉन्व्हेंट संस्कृती'मुळे मुलांचे मराठीशी असलेले नाते तुटत चालले आहे. दुसरीकडे आपल्या दैनंदिन सामाजिक व्यवहारात हिंदी भाषेने मराठीचा अवकाश मोठ्या प्रमाणावर व्यापला आहे. अशा परिस्थितीत आज शुद्ध किंवा अस्खलित मराठी बोलणाऱ्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. दैनंदिन संवादात इंग्रजी आणि हिंदी शब्दांचा इतका भडीमार होतो की मूळ मराठी शब्द काय होते हेच आम्हांला कळेनासे झाले आहे. त्यातच आता आम्हीपण 'मला पगार भेटला, पुस्तकं भेटली, परीक्षेत ९० टक्के मार्क भेटले, ९.२७ ची लोकल भेटली, नेहमीची बस भेटली' अशा (शुद्ध?) मराठीत बोलायला लागलो आहोत. असो. विद्यानंद बापट यांच्या निमित्ताने का होईना, आपल्या 'अभिजात' मराठी भाषेच्या समृद्धतेची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे, हेही नसे थोडके! सुज्ञांस अधिक काय सांगावे! **–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**| दिनविशेष**

# शेतकऱ्यांचा उत्साहाचा, आनंदाचा सण बैलपोळा

भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही केली जातात. त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो. कारण पूर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची. श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजाअर्चना करून साजरा करतात.

या सणाला पिठोरी अमावस्या, मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात. या दिवशी संपूर्ण शेतकरी बांधवांचा परिवार बैलांच्या सेवेत मग्न असतात. बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात. त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो. या सणाची सुरूवात बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते. बैलपोळ्याच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो. त्याच दिवशी म्हणजे बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात. कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात. म्हणूनच म्हणतात ''कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर'' अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा, या उद्देशाने शेतकऱ्यांना बैलांपासुन काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात. तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते. कारण वर्षभर नांगर, वखर, बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षेभर शेतात राबराब राबतात. परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात. त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात. खांदशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात ''आज आवतन घ्या उद्या जेवायला या'' ज्याप्रमाणे लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद लावून दुसऱ्या दिवशी सजवून बैलपोळ्याच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पद्धतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवून वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळ्याच्या ठिकाणी एकत्र आणले जाते. प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देतात.या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णतः सुट्टी असते. जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळ्याच्या दिवशीच विश्रांती मिळते.

यानंतर दुसऱ्याचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी बैलांचे महत्त्व लहान मुलांना समजावे या उद्देशाने लाकडाचे बैल सजवून पोळ्यामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळ्यांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो. अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासून तर बालगोपालांपर्यंत सर्वत्र बैलपोळ्याचा व तान्ह्या पोळ्याचा आनंद घेतांना दिसतात. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते. त्यामुळे यात सर्वच मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळ्यात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो. अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबणाऱ्या व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतकऱ्यांचा खरा सोबती, सखा जिवलग मित्र म्हणजे बैल. त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१० सप्टेंबर**

१) श्री. चंद्रकांत गोवर्धन शेट वेश्वी, अलिबाग, १०-९-१९५२
२) श्रीम. मंदाकिनी मोहन म्हात्रे अलिबाग, १०-९-१९४९
३) श्री. मनोहर यशवंत खराडे अलिबाग, १०-९-१९५२
४) श्रीम. सुवासिनी नारायण कडवे अलिबाग, १०-९-१९५४
५) श्रीम. प्रतिक्षा पांडुरंग पाटील वरसोली, १०-९-१९५६
६) श्रीम. दक्षता दिलीप चिकाटे अलिबाग, १०-९-१९६०
७) विजय मदुसुदन साष्टे अलिबाग, १०-९-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

## स्मिता पोतनीस यांना पुरस्कार

**अलिबाग :** सन १९७१ सालापासून इंडियन फिजिक्स असोसिएशन- पुणे विभागातर्फे, मराठीतून विज्ञान प्रसाराकरिता मो. वा. चिपळोणकर पुरस्कार देण्यात येतो. २०२६च्या पुरस्काराकरिता स्मिता पोतनीस (मुंबई) यांची निवड झाली आहे.



१९९० पासून या पुरस्काराची सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शनिवारी (दि.५) झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराच्या परीक्षण समितीमध्ये प्रा. पंडित विद्यासागर, डॉ. संजय ढोले आणि डॉ. विकास मठे यांचा समावेश होता.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**चिरनेर :** दिल्ली येथील गुंज सामाजिक संस्था व युवा फ्रेंडस सर्कल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च प्राथमिक सेमी इंग्लिश खारपाडा शाळेत रायगड जिल्हा समन्वयक आनंद खरे यांच्या नेतृत्वाखाली इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या १८० विद्यार्थ्यांना सोमवारी (दि.७) शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच, यावेळी शाळेतील भारत टॅलेंट सर्च परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी श्रीराज पाटील, कस्तुरी पाटील या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला अश्विनी ठाकूर, भूषण पाटील, कैलासराजे घरत, धीरज म्हात्रे, प्रवीण पाटील, प्रगती नाईक, दिनकर पाटील, ज्योती पाटील, सुरेखा रुपनर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होता.

# सुधागडातील पाणीप्रश्नाला दिलासा

## • शर्मिला बोडकेंकडून जलजीवन योजनेची पाहणी; सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश

**। पाली । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी रायगड जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके यांनी पुढाकार घेतला आहे. हातोंड ग्रामपंचायत हद्दीत राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी योजनेतील त्रुटी तातडीने दूर करत नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.



जलजीवन योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट असताना काही ठिकाणी कामातील त्रुटी व अपूर्ण कामांमुळे नागरिकांना अपेक्षित पाणीपुरवठा मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर बोडके यांनी हातोंड ग्रामपंचायत हद्दीतील योजनेच्या कामाची पाहणी करत प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी पाणीपुरवठा योजनेतील आवश्यक दुरुस्ती, अपूर्ण कामे तसेच पाणीपुरवठ्यात येणाऱ्या अडचणींची माहिती त्यांनी घेतली. ज्या ठिकाणी त्रुटी आहेत त्या तातडीने दूर करून गणेशोत्सवापूर्वी नागरिकांना नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा मिळेल यासाठी कामांना गती द्यावी, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व यंत्रणेला केल्या.

गणेशोत्सवात गावोगावी चाकरमानी मोठ्या संख्येने दाखल होत असल्याने पाण्याची मागणी वाढते. त्यामुळे उपलब्ध पाणीस्रोत, जलजीवन योजनेची सद्यस्थिती आणि वितरण व्यवस्थेचा आढावा घेऊन नागरिकांना पाण्यासाठी गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेण्यावर त्यांनी भर दिला.

### आवश्यक उपाययोजना राबवाव्यात

सुधागड तालुक्यातील पाणीटंचाई जाणवणारी गावे आणि दुर्गम वाड्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे बोडके यांनी यावेळी स्पष्ट केले. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा असून, पाणीपुरवठ्याच्या कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये. टंचाईग्रस्त भागांची माहिती घेऊन तेथील समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

> **“ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नियमित व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. जलजीवन योजनेतील त्रुटी तातडीने दूर करून टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांच्या पाणीप्रश्नाला प्राधान्य द्यावे.**
> **– शर्मिला बोडके, रा.जि.प. सदस्या”**

## स्मिता जगताप यांना पुरस्कार

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (सुधागड) च्या उपाध्यक्षा तथा रा.जि.प. शाळा रासळ आदिवासी वाडी येथील मुख्याध्यापिका स्मिता सुजित जगताप यांना रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६-२७ जाहीर झाला आहे. अतिशय दुर्गम अशा आदिवासी वाडीतील शाळेत शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी व शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन जिल्हा परिषदेने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे.



या पुरस्कारामुळे सुधागड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले असून, शिक्षक वृंद, ग्रामस्थ आणि पालक वर्गातून तसेच समाजसेवक दिलीप धनावडे यांच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

## फिजिओथेरपी दिनानिमित्त जनजागृती मोहीम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त कर्जत येथील चांदई येथे असलेल्या डॉ. एन.वाय. तासगावकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या वतीने रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे फिजिओथेरपी जनजागृती मोहीम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फिजिओथेरपी सप्ताहानिमित्त विविध उपक्रमांपैकी हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांच्यासाठी राबवण्यात आला.



फिजिओथेरपी बाह्य रुग्ण विभागातून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यावेळी रुग्णालयातील विविध रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईक यांना जनजागृती कार्यक्रमासाठी एकत्रित करण्यात आले. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी जागतिक फिजिओथेरपी दिनाचे महत्त्व, फिजिओथेरपीचे आरोग्य संवर्धनातील योगदान आणि दैनंदिन जीवनातील शारीरिक हालचालींचे महत्त्व याबाबत संक्षिप्त माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी जागतिक फिजिओथेरपी दिनाच्या यावर्षीच्या विषयावर आधारित माहितीपूर्ण पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी आजार आणि स्ट्रोक यांच्या प्रतिबंध, व्यवस्थापन व पुनर्वसनामध्ये फिजिओथेरपी आणि नियमित शारीरिक सक्रियतेची भूमिका प्रभावीपणे मांडण्यात आली. पथनाट्याच्या माध्यमातून नियमित व्यायाम, सक्रिय जीवनशैली, योग्य शारीरिक हालचाल, आजारांनंतरचे पुनर्वसन तसेच दैनंदिन जीवनातील शारीरिक निष्क्रियतेमुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक धोके तसेच शारीरिक सक्रियतेमुळे होणारे फायदे सोप्या व परिणामकारक पद्धतीने मांडले.

## ‘राष्ट्रीय पोषण माह’उपक्रमाचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशभरात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पोषण माह २०२६ अंतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ‘आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी’ या संकल्पनेतून अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून बालक, गर्भवती महिला, स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुली यांच्या पोषण व आरोग्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील अंगणवाडी केंद्राशी जोडले जावे, बालकांच्या आरोग्य व पोषणाकडे लक्ष द्यावे आणि कुपोषणमुक्त मुंबईसाठी योगदान द्यावे, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

मुंबई शहर व उपनगरातील अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून पोषण रॅली, पालक बैठका, जनजागृती कार्यक्रम, पाककला स्पर्धा, पोषण प्रदर्शन, वाढ मापन, आरोग्य तपासणी, पोषण शपथ तसेच विविध प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कुपोषण निर्मूलनासोबतच पहिल्या १,००० दिवसांचे महत्त्व, पूरक आहार, स्तनपान, बाल संगोपन, स्वच्छता व आरोग्यदायी जीवनशैली याबाबत कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यासाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस, मुख्यसेविका व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

पहिल्या हजार दिवसांचे महत्व, पोषण व आहार बालकांची वाढ व विकास कार्यक्रम, माता व किशोरवयीन मुलींचे आरोग्य, समुदायाचा सहभाग या पाच प्रमुख कार्यक्रमांवर भर देण्यात येणार आहे. तसेच, मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये आहारातील विविधता आणि पुरेसे प्रथिने, पूरक पोषण आहार, समुदायाची मालकी व उत्तरदायित्व, बालविकासासाठी पोषण आणि बाल्यकालीन उद्दीपन, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना असे मुख्य पाच उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यातील नागरिकांनी, मातांनी व पालकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## रक्तदान, आरोग्य प्रशिक्षण शिबीर

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

श्रीमती गीता द. तटकरे पॉलिटेक्निक, गोवे-कोलाड येथील राष्ट्रीय सेवा योजना, सीईएसए आणि एसजीडीटीपी माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी व प्राथमिक प्रथमोपचार प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या माध्यमातून हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. अलिबाग सिटी हॉस्पिटलचे डॉ. दीपक गोसावी व त्यांच्या वैद्यकीय पथकाने रक्तदान शिबिरासाठी मोलाचे सहकार्य केले. रक्तदानासाठी विद्यार्थ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दाखविलेला उत्साह उल्लेखनीय ठरला. याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र, आंबेवाडीचे डॉ. सूरज काटोले व त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच प्राथमिक प्रथमोपचाराचे प्रशिक्षण दिले.

## तंटामुक्त अध्यक्षपदी जगदीश सुतार

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

गोमाशी ग्रामपंचायतीच्या वतीने सोमवारी (दि.७) विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेत तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी जगदीश भास्कर सुतार यांची तंटामुक्त अध्यक्षपदी एकमताने तथा बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या नावाला ग्रामस्थांनी एकमुखी पसंती दर्शविली. गावातील भांडणे, वादविवाद गावातच सामोपचाराने मिटवून ‘तंटामुक्त गाव, समृद्ध गाव’ ही संकल्पना राबवण्यासाठी तंटामुक्त समिती महत्त्वाची भूमिका बजावते.



नवनिर्वाचित अध्यक्ष जगदीश सुतार हे सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असून, त्यांच्या नेतृत्वाखाली गावातील ऐक्य अधिक मजबूत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. निवडीनंतर ग्रामपंचायत, ग्रामस्थ व विविध मान्यवरांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## गोरेगाव एसटी स्थानकात खड्ड्यांचे साम्राज्य

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव एसटी बस स्थानकाच्या आवारात ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. तसेच विष्णू तलावाचा रस्तादेखील खड्डेमय झाल्याने यावर्षी गणपती बाप्पा खड्ड्यातून जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे खड्डे तातडीने बुजवण्यात यावेत, अशी मागणी गोरेगावकरांकडून केली जात आहे.



माणगाव तालुक्यातील गोरेगाव हे महत्त्वाचे शहर आहे. या शहरात मुख्य बाजारपेठ आहे. त्यामुळे दररोज हजारो लोक आजुबाजूच्या गावातील बाजारहाट करण्यासाठी येत असतात. सामान्य जनतेचे एसटी बस हे दळणवळणाचे साधन आहे. त्यांची सर्व कामे एसटी बसच्या भरवशावर अवलंबून असतात. सध्या एसटी बस स्थानकाचे काम कासवगतीने सुरू आहे. त्यामुळे खड्डे अधिक वाढले आहेत. मात्र ते खड्डे बुजविण्यासाठी कोणीही सौजन्य दाखवत नाही. त्यामुळे अनेकदा या खड्ड्यात पडून प्रवासी जखमी झाले आहेत.

एसटी महामंडळाने हे खड्डे भरण्यासाठी कानाडोळा केला असून या बस स्थानकाकडे लोकप्रतिनिधींचेदेखील दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे संताप व्यक्त होत असून. हे खड्डे गणेशोत्सवापूर्वी न भरल्यास आंदोलनाचा इशारा नागरीकांकडून देण्यात आला आहे.

**दौलतगडावर स्वच्छता, संवर्धन मोहीम | उपक्रमात दुर्गसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग**

# ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी तरुणाई सरसावली

**। महाड । प्रतिनिधी ।**

छ. शिवाजी महाराजांच्या अलौकिक पराक्रमाने पुनीत झालेल्या गडकिल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा जपणे हे प्रत्येक शिवभक्ताचे आद्य कर्तव्य आहे. हाच उदात्त विचार उराशी बाळगून दुर्गविश्व प्रतिष्ठान आणि दौलतगड प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दासगाव येथील ऐतिहासिक दौलतगडावर विशेष स्वच्छता व संवर्धन मोहीम अत्यंत उत्साहात पार पडली. ‘‘आपला गड, आपली जबाबदारी‘‘ हे प्रेरणादायी ब्रीदवाक्य समोर ठेवून आयोजित या उपक्रमात



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या दुर्गसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संवर्धनाचा नवा आदर्श निर्माण केला.

सर्व दुर्गप्रेमींनी सकाळी सात वाजता ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’ आणि ‘जय भवानी, जय शिवाजी’ या जयघोषाने परिसर दुमदुमवून सोडला. शिवरायांना वंदन करून गडाच्या चढाईला सुरुवात झाली. गडमाथ्यावर पोहोचल्यानंतर दुर्गसेवकांनी स्वच्छता, कचरा संकलन आणि पायवाटा मोकळ्या करण्यासाठी विविध पथके तयार करून कामाला सुरुवात केली.

या श्रमदानादरम्यान पर्यटकांनी टाकलेले प्लास्टिक, काचेच्या बाटल्या, सुका कचरा आणि अनावश्यक झुडपे साफ करण्यात आली. गडावरील पुरातन अवशेष, बुरुज व पायवाटांचा परिसर स्वच्छ करून ऐतिहासिक वास्तूंची दुरवस्था दूर केली. या मोहिमेत रायगड जिल्ह्यातील महाड, माणगाव, रोहा या तालुक्यांसह अकोला, कोल्हापूर, मुंबई व पुणे अशा दूरवरच्या भागांतून आलेले दुर्गप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> **“आपला ऐतिहासिक वारसा आणि गडकिल्ले हे केवळ दगडधोंडे नसून आपल्या अस्मितेची जिवंत प्रतीके आहेत. आपला गड, आपली जबाबदारी ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण होणे आणि संवर्धनासाठी तरुणाईने पुढे येणे ही आजची गरज आहे.**
> **– निलेश निवाते, संस्थापक-अध्यक्ष, दौलतगड प्रतिष्ठान”**

> **“गडकिल्ल्यांचे संवर्धन ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती एक अखंड चालणारी चळवळ आहे. भावी पिढीसाठी हा ऐतिहासिक वारसा सुस्थितीत ठेवण्यासाठी दुर्गविश्व प्रतिष्ठान यापुढेही अशा मोहिमा सातत्याने राबवत राहील.**
> **– श्रीकृष्ण पवार, अध्यक्ष, दुर्गविश्व प्रतिष्ठान”**

## निवडक



(छायाचित्र : संजय गायकवाड)

### कश्यपी ठक्कर यांची अध्यक्षपदी निवड

**कर्जत :** इनरव्हील क्लब ऑफ कर्जत नवनिर्वाचित कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी अध्यक्षपदी कश्यपी ठक्कर यांची निवड करण्यात आली आहे. रॉयल गार्डनच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून डिस्ट्रिक्ट संपादिका सारिका धोत्रे तसेच कर्जत शाखेच्या आरपीएफच्या सब इंस्पेक्टर प्रतिभा देशमुख उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते कश्यपी ठक्कर यांनी क्लबच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. या कार्यक्रमाअंतर्गत निसर्गरम्य परिसर म्हणून प्रख्यात असलेले कर्जत या अंतर्गत प्रत्येकी झाडाचे एक रोपटे सर्वांना भेट म्हणून दिले. इनरव्हील क्लब क्लबचे कार्य पाहता नवीन पाच सदस्यांनी क्लबमध्ये यावर्षी सदस्य म्हणून नोंदणी केली. या नवीन कार्यकारणीत अध्यक्षा कश्यपी ठक्कर, उपाध्यक्ष प्राची चौडिये, सचिव वैशाली मुसळे, कोषाध्यक्ष वनिता सोनी, आयएसओ पल्लवी सावंत, संपादिका उज्वला पाटील, आयपीपी शिल्पा दगडे, सी. सी. मनीषा साबणे यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार समितीचा पदभार उत्तरा वैद्य, सरस्वती चौधरी, मोनिका बडेकर आणि अवंतिका गायकर यांच्याकडे देण्यात आला.




### विद्यार्थिनीला व्हीलचेअर भेट

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यमातून डोंगरपाडा येथील आदिवासी विद्यार्थ्याला व्हीलचेअर भेट देण्यात आली. नेरळ-कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर डोंगरपाडा येथील आदिवासी व्यक्तीचा दुचाकीवरून जाताना अपघात झाला होता. त्या अपघातात डोंगरपाडा येथील कामिनी भरत भालचीम ही विद्यार्थिनी जखमी झाली होती. तिला हातापायाने चालणे कठीण जात आहे. ही बाब नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर ट्रस्टच्या वतीने व्हीलचेअर देण्याचा निर्णय झाला. कामिनी हिला आवशयक असलेली व्हीलचेअर तिच्या घरी जाऊन श्री साई ट्रस्टकडून देण्यात आली. त्यावेळी श्री साई ट्रस्टचे संचालिका राधिका घुले, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि ट्रस्टचे कार्यकर्ते दिलीप घुले यांच्यासह डोंगर पाडा येथील ज्ञानेश्वर बुरुड, तिटकारे आदी उपस्थित होते.



### नेने कन्या शाळेच्या शिरपेचात दुहेरी मानाचा तुरा

**पेण :** महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार सोहळ्यात पेण एज्युकेशन सोसायटीच्या म. ना. नेने कन्या विद्यालयातील दोन शिक्षिकांना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षिका ज्योती पाटील (मुंबईकर) आणि शिक्षिका अर्चना नेमाडे यांनी हा पुरस्कार प्राप्त केल्याने विद्यालयाच्या शिरपेचात दुहेरी मानाचा तुरा खोवला गेला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पेण एज्युकेशन सोसायटीच्या संचालक मंडळाच्या वतीने दोन्ही शिक्षिकांचे विशेष कौतुक करण्यात आले. यानिमित्ताने पेण एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयात नुकताच सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, उपाध्यक्ष संजय कडू, मानद सचिव जोशी, संस्थेचे सदस्य अमित देव, श्रीराम दातार, डॉ. निता कदम, म. ना. नेने कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व्हि.व्ही. पाटील, कार्यालयीन प्रमुख शंकर भट आदी उपस्थित होते. दोन्ही शिक्षिकांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. राज्यस्तरीय पुरस्कारामुळे विद्यालयाच्या लौकिकात आणखी भर पडली असून, या यशाबद्दल शिक्षिका, मुख्याध्यापिका तसेच संपूर्ण विद्यालयाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### तटकरे महाविद्यालयाचे वक्तृत्व ठरले सर्वोत्कृष्ट

**तळा :** मुंबई विद्यापीठ युवा महोत्सव वादविवाद (मराठी) स्पर्धेची अंतिम फेरी मुंबई विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट येथे मंगळवारी (दि.८) पार पडली. या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या १२ विभागातील ७० पेक्षा अधिक निवडक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या मानाच्या वादविवाद स्पर्धेत द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाने सांघिक गोल्ड मेडल प्राप्त केले. याच स्पर्धेतील मुंबई विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट वक्त्याचा पुरस्कार द.ग. तटकरे महाविद्यालयाचा विद्यार्थी ध्रुव राऊत यास देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत द.ग. तटकरे महाविद्यालयाच्या वादविवाद संघात पंकज पंडूळे व ध्रुव राऊत या दोन विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.भगवान लोखंडे व प्रा. भरत चाळके यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेतील उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त नंदकुमार वेदक, मारुती शिर्के, विठ्ठल जोशी, संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन पुरुषोत्तम मुळे, संस्थेचे सचिव महेंद्र कजबजे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नानासाहेब यादव, संस्था पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सदस्य, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक प्राध्यापकांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# पालीत एसटी पकडण्यासाठी संघर्ष

## || बसस्थानक आवारातील चिखलाचे साम्राज्य || पाण्याचा निचरा करण्याची प्रवासी वर्गाची मागणी

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी|**

पाली शहरातील एसटी बसस्थानकाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, बसस्थानकाच्या आवारात सर्वत्र चिखल, पाणी आणि खड्डे निर्माण झाले आहेत. एसटी बस पकडण्यासाठी प्रवाशांना चिखल तुडवत बसपर्यंत जाण्याचा संघर्ष करावा लागत आहे. बसमधून उतरल्यानंतर बाहेर येतानाही नागरिकांना याच चिखलातून मार्ग काढावा लागत आहे.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या काळात मुंबई, ठाणे, पुणे तसेच इतर शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त राहणारे अनेक चाकरमानी गणेशोत्सवासाठी आपल्या गावाकडे परततात.

### खड्ड्यांची दुरुस्ती करा

प्रशासनाने केवळ आश्वासने न देता गणपतीपूर्वी बसस्थानकाच्या आवारातील चिखल व खड्ड्यांची तात्पुरती दुरुस्ती करावी, पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी आणि प्रवाशांना सुरक्षितपणे बसमध्ये चढता-उतरता येईल, अशी व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी पालीकर व प्रवासी वर्गातून होत आहे.

त्यापैकी मोठा वर्ग एसटी बसने प्रवास करतो. मात्र, पाली बसस्थानकाची सध्याची अवस्था पाहता प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

बसस्थानकाच्या आवारातील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने पायी चालणेही कठीण झाले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच सामान घेऊन प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे. चिखलातून मार्ग काढताना घसरून पडण्याचा धोकाही कायम आहे.




विशेष म्हणजे, पाली एसटी बसस्थानकाच्या कामाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. बसस्थानकाचे काम लवकरात लवकर मार्गी लागावे, अशी मागणी पालीकरांकडून सातत्याने होत आहे. मात्र, कायमस्वरूपी कामाला विलंब होत असताना, किमान सध्याच्या पावसाळ्यात प्रवाशांना ये-जा करता यावी यासाठी बसस्थानकाचा परिसर तातडीने दुरुस्त करण्याची गरज आहे, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालीत मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ वाढणार आहे. त्यामुळे बसस्थानकाच्या आवारातील चिखल, खड्डे आणि पाण्याच्या निचऱ्याची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी प्रवासी व पालीकरांकडून होत आहे.

वर्षानुवर्षे रखडलेल्या बसस्थानकाचे काम कधी पूर्ण होईल ते होईल; मात्र सध्या प्रवाशांना चिखल तुडवत एसटी पकडण्याची वेळ का यावी? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## निवडक



### श्रीधर जंजिरकरांना रायगड भुषण पुरस्कार

**आगरदांडा :** नांदगांव मुरुडचे सुपुत्र श्रीधर जंजिरकर कृषीपदवीधर गेले २५ वर्षे पासून कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी देशभरात अनेक ठिकाणी कृषी क्षेत्रातील अनेक घटकांचे प्रशिक्षण घेतले असून त्यांनी आपल्या रायगड जिल्ह्यातील शेतकरी साठी अनेक प्रशिक्षणे आयोजित करतात शेळीपालन, कुक्कुटपालन, भाजीपाला लागवड,शेततळे, मत्स्यपालन, गांडुळखत प्रशिक्षणे आयोजित करून रायगड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी लाभ घेऊन शेती क्षेत्रात प्रगती केली आहे. जंजिरकर किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष आहेत. या माध्यमातून ते गुणवंत शेतकरी १०० जोडप्यांचा सत्कार दर वर्षे करीत आले आहेत. शेतकरींसाठी आरोग्य शिबीर आयोजित करतात. शेतकरींसाठीच्या लढ्यात सहभागी होत असतात. अशा निस्वार्थी व्यक्तीमत्वाच्या कार्याची दखल ॲन्टी करप्शन बोर्ड, नवी दिल्ली यांनी घेऊन त्यांच्या नुकताच पार पडलेल्या जिल्ह्यातील नेरळ ता. कर्जत येथे देशव्यापी अधिवेशनात जंजिरकर यांना रायगड भुषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी देशभरातून आलेले ॲन्टी करप्शन बोर्डचे पदाधिकारी, पोलिस अधिकारी, प्रतिष्ठित नागरीक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.



### संत शिरोमणी पुण्यतिथी साजरी

**नागोठणे :** नाभिक समाजाचे थोर संत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी मंगळवारी (दि. ८) सप्टेंबर रोजी नागोठणे शहर व विभाग नाभिक संघ तसेच महिला आघाडी, नागोठणे यांच्या वतीने ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास नाभिक समाजाचे मार्गदर्शक भाई टके, बाळासाहेब टके, मिलिंद गुजर, शैलेश रावकर, सुधाकर निंबाळकर, रविंद्र टके, दिगंबर खराडे, मनोज गायकवाड, उदंड रावकर, हरीश टके, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, शिवाजी नेरपगार, मंगेश गायकवाड, बापू रावकर, भाई शिंदे, शेखर टके, ॲड. श्रीकांत रावकर, मनोज टके, चेतन टके, ॲड. रमेश जाधव, सचिन नेरपगार, महेंद्र पवार, विवेक रावकर, विनायक निंबाळकर, शंकर चव्हाण, राकेश शिर्के, दीपक पवार, सिताराम टके, संजय टके, संतोष माने, संदीप जाधव, मोहन देवकर, राजेंद्र माने, दिपाली टके, कल्पना टके, मनिषा टके, नम्रता माने, दर्शना खराडे, हेमलता नेरपगार, प्रियांका टके, सारिका निंबाळकर, लता मोहिते, शालिनी जाधव, प्रगती जाधव, मनोरमा रावकर, जयश्री दिवेकर, विजया चव्हाण, नीता रावकर, मीना माने, स्मिता गुजर, माधवी मोरे, श्रद्धा जाधव, राधा टके, सुनीता गुजर, सारिका जाधव, रोहिणी रावकर आदी समाज बांधव भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

### शिवस्मारकाचे स्वप्न भंगणार

**माणगाव :** शिवकाळात माणगाव शहर हे छत्रपती शिवाजी महाराज यांची लष्करी तळ होते. रायगड आणि माणगाव तालुक्याच्या रक्षणासाठी सैनिक डोळ्यात तेल घालून स्वराज्याचे रक्षण करीत होते. माणगाव शहरात शिवरायांचे स्मारकासाठी जागा उपलब्ध होत नाही यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. त्यामुळे शिवभक्तांचे स्वप्न भंगणार आहे. निधी एक वर्ष पडून आहे. हा निधी वेळेवर खर्च झाला नाही तर परत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शिवभक्तांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. छत्रपती शिवाजीराजांचे स्मारक बांधण्यासाठी जुन्या पंचायत समितीच्या आवारातील जॉली स्पोर्ट्स क्लबची स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर व्यायाम शाळेची इमारत बांधकाम तोडून ही जागा शिवस्मारकासाठी देण्यात आली होती. तसेच जवळपासची दुकाने आणि टपर्या तोडण्यात आल्या होत्या. मात्र, या शिवस्मारकाला अद्यापही जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही. ही जागा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती माणगावची होती. आता ही जागा उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने ट्रामा सेंटरसाठी संपादित केली आहे. त्यामुळे ही जागा उपलब्ध होत नाही. मुंबई गोवा महामार्गाच्याकडेला हे शिवाजीराजांचे स्मारक झाले असते तर, पर्यटन विकास झाला असता. पर्यटक थांबले असते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारके दिमाखात उभे राहिले आहेत. मात्र, माणगाव जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण आणि तालुक्याचे मुख्य ठिकाण असूनही शिवस्मारक नसल्याची खंत शिवभक्त व्यक्त करत आहेत.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दूकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६
- नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६
- ऑफिस कामाकरीता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑफिस असिस्टंट रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण- ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT संपर्क- विधान्त इंफ्रा + ९१७२१९२९१२३१ पत्ता- अलिबाग वेळ- ११.०० ते ५.००
- Vacancy in furniture Workshop office
Education - Graduation Experience - 2 years
Location - Bamansure, chondhi
Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## मराठी चित्रपट कलाकारांना काव्यसंग्रहांची भेट

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी, मोहोपाडा, आपटा परिसरात कवी, लेखक, चारोळीकार, निवेदक, प्रकाशयोजनाकार आणि पक्षीनिरीक्षक म्हणून परिचित असलेले कवी अनिल दाभाडे यांच्या साहित्यिक कार्याची विशेष छाप निर्माण झाली आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानाची परिसरात मोठ्या आदराने दखल घेतली जाते. कवी अनिल दाभाडे यांनी आतापर्यंत पाच हजारांहून अधिक चारोळ्या, आठशेहून अधिक कविता तसेच सुमारे चारशेहून अधिक लेख लिहिले आहेत. गड-किल्ले, प्राचीन मंदिरे, सागरकिनारे तसेच परिसरात स्थलांतर करून येणारे पक्षी अशा विविध विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. त्यांच्या लेखणीतून निसर्ग, इतिहास आणि सामाजिक जाणिवांचा सुंदर मिलाफ



अनुभवायला मिळतो. दाभाडे यांच्या साहित्यिक प्रवासातील आतापर्यंत चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून, हे साहित्य विविध रसिकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान, पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'एकदा पहावं करून' या नाटकाच्या निमित्ताने मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीतील कलाकारांची भेट झाली. यावेळी कवी अनिल दाभाडे यांनी आपल्या काव्यसंग्रहांची सप्रेम भेट कलाकारांना दिली. सुप्रसिद्ध हास्यकलाकार वैभव मांगले यांना 'चांदण्या आणि मी', हास्यकलाकार आनंद इंगळे यांना 'काजवा' तर अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांना 'सांजधारा' हे काव्यसंग्रह सप्रेम भेट देण्यात आले.

## एसटी पास कॅम्पचे आयोजन



**रसायनी :** परिसरातील तुराडे ग्रामपंचायतीच्या वतीने एस.टी. पास कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल बस डेपोमध्ये पास काढण्यासाठी वृद्ध महिला/पुरुष, नागरिकांना तासन्तास उभा राहून त्यांचे सवलतीसाठी लागणाऱ्या एस. टी. पास काम होत नसल्याने तुराडे ग्रामपंचायतच्या वतीने रंजना गायकवाड, लिना ठाकूर व अस्मिता मोकल यांच्या सहकार्याने एसटी पास कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे अनेक जणांचा वेळ वाचून त्यांच्या बस पासचे काम झाल्याने समाधान व्यक्त केले.

## पनवेल शहरात पोलिसांचे संचलन

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर एरिया डॉमिनेशन



**| पनवेल | प्रतिनिधी |**

आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पनवेल शहर पोलीस आणि राज्य राखीव दलाच्या जवानांनी शहरातील विविध संवेदनशील भागांतून संचलन आणि एरिया डॉमिनेशन केले.

पनवेल शहर पोलीस ठाण्यापासून सुरुवात झालेल्या या मार्चमध्ये ५२ बंगला, साईनगर, ख्वाजा नगरी मशीद, साई श्रद्धा मित्र मंडळ, बंदर रोड, ओंकारेश्वर महादेव मंदिर, आयशा मशीद, आदिल टॉवर, सुफा मशीद, एम.जी. रोड, कच्ची मोहल्ला, मुसलमान नाका, पाडा मोहल्ला मशीद, जलालशहा दर्गा, पनवेल महानगरपालिका कार्यालय, जय भारत नाका, लाईन आळी, वीरुपक्ष मंदिर, आदर्श हॉटेलमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक असा मार्ग निश्चित करण्यात आला होता.

या रूट मार्चमध्ये पनवेल शहर पोलीस ठाण्याचे ७ अधिकारी आणि ३५ पोलीस अंमलदार, तसेच आरएएफ बी-१०२ चे एक उपकमांडर, एक सहाय्यक कमांडर, पाच निरीक्षक, आठ उपनिरीक्षक आणि १०१ अंमलदार सहभागी झाले होते. पोलिसांची दोन आणि आरएएफची तीन वाहनेही या मोहिमेत सहभागी होती.

आगामी सणांच्या काळात शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखणे, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे तसेच संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची उपस्थिती वाढविण्याच्या उद्देशाने हा रूट मार्च काढण्यात आला. सण-उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावेत, यासाठी पोलिसांकडून शहरातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांनीही कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन वपोनि बाळा कुंभार यांनी केले आहे.

## धामोतेत हरिविजय ग्रंथाचे वाचन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील धामोते गावातील वारकरी संप्रदाय यांनी श्रावण महिन्यानिमित्त ग्रंथ वाचन करण्याचा उपक्रम राबविला. या पवित्र महिन्याचे निमित्ताने हरिविजय या ग्रंथाचे सामूहिक वाचन १५ ऑगस्टपासून सुरू झाला होता. ग्रामदेवता मंदिरात दररोज दोन तास हरिविजय ग्रंथमधील अध्यायांचे वाचन केले गेले. रविंद्र विरले यांनी ग्रंथ वाचन नियमितपणे केले. या महिनाभर गावातील अनेक बुजुर्ग ग्रामस्थ आणि वारकरी सहभागी झाले होते.

## नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**| रसायनी | प्रतिनिधी |**

प्रायमा संघटना आणि समर्थ नेत्रालय डोळ्यांचे हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने मोहपाडा येथे आयोजित करण्यात आलेल्या नेत्ररोग तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल २५९ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिरात अत्याधुनिक कॉम्प्युटर व डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ३६ रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले. संबंधित रुग्णांना पुढील उपचार व



शस्त्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रुग्णांना आय ड्रॉप्स, तर १८० रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

डॉ. विशालाक्षी रोडबाळे यांनी डोळ्यांची घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले.

मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांसाठी दुर्बिणीद्वारे सवलतीच्या दरात शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

## नांदगाव पुलाचा भाग खचला

**| पाली | प्रतिनिधी |**

सार्वजनिकबांधकामखात्याच्या निष्काळजीपणामुळे सुधागड तालुक्यातील नांदगाव पुलाला जोडणाऱ्या रस्त्याची बाजू खचली असून पुलाच्या मुख्य स्लॅबला मोठे तडे गेले आहेत. सुधागड-पाली नांदगावमार्गे कोकणात जाणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या मार्गावरच ही दुरावस्था झाल्याने वाहनचालकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत असून अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

नुकताच काही वर्षांपूर्वीच भर पावसात या पुलाचे काम घाईघाईने पूर्ण करण्यात आले होते. उद्घाटनानंतर अवघ्या काही महिन्यांतच पुलाची अशी अवस्था

> लवकरात लवकर खचलेल्या ठिकाणी दुरुस्तीचे काम करण्यात येईल. मात्र, सध्या खचलेल्या ठिकाणची स्थिती ठीक असून तो भाग पडण्याची कोणतीही भीती नाही.
> – दिनेश पराते
> प्रभारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

झाल्याने कामाच्या दर्जावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या गणेशोत्सवाचा सण तोंडावर आला असून मुंबई-ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची व वाहनांची मोठी रहदारी या मार्गावर सुरू होणार आहे. खचलेला भाग आणि स्लॅबचे तडे यामुळे एखादी



मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

एकीकडे नागरिक व वाहनचालक जीव मुठीत धरून प्रवास करत असताना, दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचा बेजबाबदार कारभार समोर आला आहे.प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तत्काळ लक्ष देऊन पुलाची भक्कम दुरुस्ती करण्याची मागणी केली जात आहे.

## लोकनृत्य स्पर्धेत वेदक विद्यामंदिर द्वितीय

**| तळा | प्रतिनिधी|**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ, ही संस्था विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर या विद्याशाखेने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, जिल्हास्तरीय लोकनृत्य व अभिनय या स्पर्धेतील लोकनृत्य या स्पर्धे त जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. गोरेगाव येथील ना. म. जोशी विद्याभवन या प्रशालेत या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील नऊ माध्यमिक शाळा सहभागी झाल्या होत्या. गो. म. वेदक विद्यामंदिर या शाळेतील



इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी स्थानिक आदिवासी समाजातील लोकनृत्य अत्यंत प्रभावीपणे सादर केले. यामध्ये अदिती शिंदे, आरोही जाधव, विधिता पालवणकर, धारिणी चौधरी, सई जाधव, अल्पना निर्मल, स्पंदन गायकवाड, नित्य खांडेकर या विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. यासाठी शाळेचे संगीत शिक्षक रोहित भागवत यांनी मार्गदर्शन केले. स्पंदन गायकवाड व हर्ष खांडेकर यांनी सुंदर गायन वादन केले. डायट या संस्थेच्या अधिव्याख्याता सुवर्णा तोरणे, कामशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धानचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय स्तरावर निवड झाल्यामुळे संस्थेचे सर्व पंधधिकारी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थाचे अभिनंदन केले.

## गौरी गणपती सणाला विशेष महत्व | पिठोरी अमावस्येला 'पात्री'ची मागणी

# रानोमाळ बहरली तेरड्याची आकर्षक फुले

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

सर्वत्र माळरान, डोंगर उतार व शेताच्या बांधावर आकर्षक तेरड्याची फुले फुलली आहेत. जांभळट, फिकट गुलाबी, तांबडे किंवा पांढरे अशा विविध आकर्षक रंगांची ही फुले सगळ्यांचेच लक्ष वेधत आहेत. गणपती बरोबर येणाऱ्या गौरी मातेला विशेष करून ही फुले अर्पण केली जातात. त्यामुळे या झाडाला गौरी किंवा गौरीची फुले किंवा गुल मेंदी असे म्हटले जाते.

येणाऱ्या-जाणाऱ्यांची ही आकर्षक रंगीबेरंगी फुले लक्ष वेधून घेतात. विस्तृत बहरलेली ही मनमोहक फुले मन प्रसन्न करतात.



फुलांचा वापर गणपतीमध्ये माटोळी साठी देखील केला जातो. चातुर्मासात तेरड्याचे महत्व पूजेसाठी असते.

गौरीच्या पुजेत तसेच पिठवरीच्या पुजेतही तेरडा हा लागतोच. पिठोरी अमावस्येला 'पात्री' म्हणून तेरडा आणावा लागतो. गौरी गणपतीच्या सणाला पूजेकरिता तेरड्याची पाने फुले वाहतात.

भारतात या प्रजातीतील सुमारे १५० जाती आढळतात. सध्या सुरु असलेले मातीचे व दगड खाणींचे उत्खनन, नवनिर्माणाची व रस्त्यांची कामे. या बरोबरच मोठ्या प्रमाणात शेतात व रानमाळावर मातीचा भराव टाकला जात असल्याने या वनस्पतींची वाढ मर्यादित झाली आहे. त्यांच्या उत्पत्तीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. अशी माहिती पालीतील वनस्पती अभ्यास अमित निंबाळकर यांनी दिली.

### औषधी उपयोग

तेरडा हा पित्तशामक असून त्याची फुले पौष्टिक आणि थंड असतात. फिलिपिन्स मध्ये फुलांचा उपयोग कंबर दुखीसाठी केला जातो. फुलांमध्ये काही ॲन्टीबायोटिक सारखे गुण सापडले आहेत. ज्यामुळे काही बॅक्टेरिया आणि फंगस नष्ट होतात. काही देशांत मेंदीप्रमाणे तेरड्याच्या पानांनी व फुलांनी हात व नखे रंगवितात. फुले थंडावा देणारी असून ती भाजलेल्या जागी लावतात. आशियातील काही देशांत ही वनस्पती संधिवात, अस्थिभंग आणि बद्धकोष्ठता इत्यादी विकारांवर वापरतात. बियांपासून मिळणारे हिरवट व चिकट तेल स्वयंपाकात व दिव्यासाठी वापरतात.

### फुलांचे विविध प्रकार

तेरड्याची फुले अतिशय नाजूक असून पावसाळ्यात माळरान व रस्त्याच्या कडेला याची रोपे आपोआप उगवतात. फुलांचे सिंगलचा तेरडा, डबलचा तेरडा तसेच संकरीत तेरडे असे विविध प्रकार देखील आहेत. या फुलांचे आयुष्य फक्त पाच ते सात दिवस असते.

# पिठोरी अमावस्येनिमित्त वनफुले बाजारात दाखल

**खांदा कॉलनी :** पिठोरी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या कर्नाळा सर्कल परिसरात जंगलातील विविध प्रकारची फुले, पाने आणि वनस्पती विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर दाखल झाली आहेत. गुरुवारी पिठोरी अमावस्या असल्याने पूजेसाठी आवश्यक असलेल्या पारंपरिक वनस्पती खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत आहे.पावसाळ्यात जंगल परिसरात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या विविध वनस्पतींना पिठोरीच्या पूजेमध्ये विशेष महत्त्व आहे. स्थानिक परंपरेनुसार दूर्वा, आघाडा, रुई, तुळस, बेलपत्र, आपटा, कण्हेर, शमी यांसारख्या वनस्पतींचा उपयोग पूजेसाठी केला जातो.

स्थानिक परंपरेनुसार पिठोरीच्या संचामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या रानभाज्या, पाने, फुले आणि वनस्पतींचा समावेश केला जातो.

## जाहीर नोटीस

खाली नमूद केलेली मिळकत श्री.आदिनाथ सिताराम रानवडे यांचे मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणगांव ता.अलिबाग | १३४/१ | ०-७५-००<br>पो.ख. ०-०५-६०<br>०-८०-०० | ९.१५ |

सदर मिळकत विकत घेण्याबाबत आमचे अशील आणि जमीन मालक यांचे दरम्यान बोलणी चालू आहेत. मात्र कोणताही व्यवहार ठरवण्यापूर्वी जमिनीच्या मालकी हक्काबाबत खात्री करण्याकरता आणि त्यामध्ये काही वाद असल्यास त्याची माहिती होण्याकरता ही नोटीस देण्यात येत आहे.

तरी या नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर नमूद जमीन मालक यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही सदर जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत कोणताही वाद याआधी पासून चालू असल्यास आणि कोणाचीही आमचे अशील ठरवित असलेल्या व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तीने पंधरा (१५) दिवसात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी.

सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असल्याचे समजून आमचे अशील खरेदी व्यवहार ठरवतील आणि त्यानंतर येणारी कोणाचीही हरकत बंधनकारक राहणार नाही.

अलिबाग
ता. १०/०९/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा-रायगड, तालुका-पेण, मौजे-जिते येथील खालील वर्णन केलेली जमीन

| गाव | मालक | भुमापन क्र व उपविभाग | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जिते | दिपक जगन्नाथ म्हात्रे व इतर सहा | ३९/२३/अ<br>३९/२४<br>४३/९<br>४०/७<br>एकूण क्षेत्र | ०.२१.५०<br>०.०७.००<br>०.०४.००<br>०.०१.००<br>०.३३.५० | ३.४६<br>०.०९<br>०.००<br>०.०३ |
| जिते | मोहन गणपत म्हात्रे व इतर | ३९/२२ | ०.०९.७० | १.१२ |
| जिते | दत्तात्तेय सिताराम म्हात्रे व इतर चार | ४०/४ | ०.०७.०० | ७.१७ |
| | सर्व | एकुण क्षेत्र =०.५०.२० हे.आर इतके आहे. | | |

ही जमीन तिचे नोंदणीकृत मालक, दिपक जगन्नाथ म्हात्रे व इतर वर नमुद केलेले सर्व रा.जिते, ता.पेण, जि-रायगड यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीची आहे, सदर जमीनी बाबत खरेदीचा व्यवहारास निश्चित झाला आहे तरी वरिल मिळकतीच्या बाबतीत कोणाची कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पार्वती, साठेकरार, खरेदीखत गहाणखत, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रातील दान, जाती अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १२ (बारा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवुन घ्यावी. विहित मुदतीत अशी कोणाचीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक

सही/-
**संजय कमलाकर ठंगर**
रा.बळवळी ता.पेण जि.रायगड
९२२६१६१९५५

अर्जदारांचे वकिल
ॲड. तन्मय. जि. म्हात्रे
ॲड. मयुरेश म. पाटील

## जाहिर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (वरीष्ठ स्तर) यांचे कोटीत
दिवाणी चौ. अर्ज नं. १३१/२०२६

१) श्रीमती. मेघा अरविंद शेंडे
वय ६५ वर्ष, व्यवसाय -वकिली,
मुळ रा. प्लॉट नं. ४४६, १/नविन गुरुकुल,
मालमत्ता क्रमांक PENN000१३३८, म्हाडा कॉलनी,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
सध्या रा.B/१, करुणा को. हा.सो. लिमिटेड,
प्लॉट नं. ४५, सेक्टर २९, वाशी, नवी मुंबई-४००७०३
आधार नं. ४२०७ २८१६ ९२७९
२) श्रीमती. सुजल कृष्णा कांबळे
वय ५६ वर्ष, व्यवसाय - वैद्यकीय,
रा.१४/१११, उत्तम नगर, २, नवज्योत को.
हा. सोसा, एम.जी.रोड, बालिगा हॉस्पिटल मागे, अर्जदार
गोरेगांव (प) मुंबई - ४००१०४.
आधार नं. ९६७६ ३२५५ ६१७६,
३) श्रीमती हेमा अचल दाते
वय ६२ वर्ष, व्यवसाय प्रोफेसर,
रा.निटी कॅम्पस, आय आय एम मुंबई
टाईप ५, रुम नं. ९, निटी कॅम्पस,
विहार लेक मार्ग पवई, मुंबई - ४०००८७
आधार नं. ४६२५ ७०९३ ०६२३
४) श्रीमती. निलम शंकर कंठे
वय ६७ वर्ष, व्यवसाय - गृहिणी,
रा. ४०/४३, सिल्वर सैन्ड सोसायटी,
आदर्श नगर, लिंक रोड, जोगेश्वरी, मुंबई
आधार नं. ४०८६ ७३५१ ४४६६

आणि

पक्षकार कोणीच नाहीत ..... सामनेवाला

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

ज्याअर्थी कै. कृष्णा सिद्धप्पा कांबळे हे दि. ०९/०१/२०१८ (नऊ/ एक/ दोन हजार अठरा) रोजी मु.१४/१११, एम. जी. रोड, गोरेगाव मुंबई-४००१०४ येथे मयत झाले असून जिल्हा- रायगड, तालुका-पेण, पेण नगरपरिषदेच्या हद्दीमधील मौजे - पेण म्हाडा कॉलनी येथील सर्व्हे नं. २६६, प्लॉट नं. ए-१६/२, क्षेत्र ७०४.०० चौ. मी. ही मिळकत कै.कृष्णा सिद्धप्पा कांबळे यांच्या मालकीची आहे. त्यांस अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. असे ठरवून मिळणेंकरीता अर्जदाराने अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात वरील प्रमाणे अर्ज केला आहे.

सबब तसा वारस दाखला देणेसंबंधी कोणाचीही कोणतीही हरकत आल्यास त्यांनी लेखी स्वरुपांत तारीख १६/१०/२०२६ रोजी मे. कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदारास वारस दाखला दिला जाईल.

सदर मिळकतीकरिता अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेकरिता अर्जदारांनी अलिबाग कोर्टात वरील प्रमाणे अर्ज केला आहे. सबब तसा वारस दाखला देणे संबधी कोणाच्या काही हरकती आल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्यांचे आंत अथवा तारीख १६/१०/२०२६ रोजी मे. कोर्टात हजर होवून लेखीस्वरुपांत मे. कोर्टात दाखल कराव्यात आणि प्रस्तुत जाहीरनाम्याने असे कळविणेंत येत आहे की, विहित मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास मे.न्यायालयात अर्जदार १) श्रीमती. मेघा अरविंद शेंडे, २) श्रीमती. सुजल कृष्णा कांबळे, ३) श्रीमती हेमा अचल दाते, ४) श्रीमती निलम शंकर कंठे यांना त्यांचे हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क सिद्ध झाल्यास अर्जदारांस कै. कृष्णा सिद्धप्पा कांबळे यांचे वारस असल्याचा वारस दाखला देणेत येईल.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
अलिबाग

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर
अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

खाली नमूद केलेली मिळकत श्री. अनिल प्रतापराव संघवी यांचे मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणगांव | १३४/५ | १-६४-२०<br>पो.ख. ०-०६-८०<br>१-७१-०० | ११.०९ |

सदर मिळकत विकत घेण्याबाबत आमचे अशील आणि जमीन मालक यांचे दरम्यान बोलणी चालू आहेत. मात्र कोणताही व्यवहार ठरवण्यापूर्वी जमिनीच्या मालकी हक्काबाबत खात्री करण्याकरता आणि त्यामध्ये काही वाद असल्यास त्याची माहिती होण्याकरता ही नोटीस देण्यात येत आहे.

तरी या नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर नमूद जमीन मालक यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही सदर जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत कोणताही वाद याआधी पासून चालू असल्यास आणि कोणाचीही आमचे अशिल ठरवित असलेल्या व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तीने पंधरा (१५) दिवसात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी.

सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असल्याचे समजून आमचे अशील खरेदी व्यवहार ठरवतील आणि त्यानंतर येणारी कोणाचीही हरकत बंधनकारक राहणार नाही.

अलिबाग
ता.१०/०९/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. वनिता जनार्दन म्हात्रे रा.मु.केळवणे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी मौजे दवणसर, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक श्री. अजय सुरेश गावंड, श्री. मिलिंद रविंद्र ठाकूर, श्री. शरद शांताराम म्हात्रे व श्री. समाधान धावजी म्हात्रे यांचे सामाईक मालकीचे व हिश्शाचे स्वतंत्र असे ००-१७-०० (हे.आर.चौमी) व पोटखराबा ००-०३-०० (हे. आर. चौमी) असे एकूण ००-२०-०० (हे.आर.चौमी) एवढे क्षेत्र हे त्यांचेकडुन कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर. प्रति) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| दवणसर | ३८ | १-५४-८० | ११.५९ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे श्री. अजय सुरेश गावंड, श्री. मिलिंद रविंद्र ठाकूर, श्री. शरद शांताराम म्हात्रे व श्री. समाधान धावजी म्हात्रे यांचे सामाईक मालकीचे व हिश्शाचे स्वतंत्र असे ००-१७-०० (हे. आर. चौमी) पोटखराबा ००-०३-०० (हे.आर. चौमी) असे एकूण ००-२०-०० (हे. आर. चौमी) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि. ०९/०९/२०२६

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा. मु.दुरशेत, पो. बळवळी ता. पेण, जि. रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग जि. रायगड येथील सर्व्हे नं. ५०/ब, या बिनशेती मिळकतीमधील बिनशेती प्लॉट नं.४५, एकूण क्षेत्र ०-०५-८ हे. आर व प्लॉट नं. ४६, क्षेत्र ०-०५-६ हे. आर या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या भालचंद्र स्मृती या इमारतीमधील दुसऱ्या तळमजल्यावरील निवासी सदनिका नं. १४, क्षेत्र ४३९ चौ. फूट (४०.८० चौ. मी. बिल्टअप) (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. ११४७/१४) ही श्याम सुधाकर कदम व स्नेहा श्याम कदम यांचे नावे व ताबेकब्जा वहिवाटीत असलेली सदनिका विकत घेण्याचे ठरविले आहे.

संदर्भित निवासी सदनिका मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, बक्षिस, ताबा, बोजा, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १०.९.२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग,
जि. रायगड मो.नं.९८२२१८६७४०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) किशोर वालजी पटेल<br>२) दयाराम रामजी पटेल | ६९ | ६ | ०-३९-७० | ५-८१ |
| ३) निशीत प्रमोद पटेल | ६९ | ९ | ०-१०-६० | ०-१९ |
| ४) पुरुषोत्तम रामजी पटेल | ६९ | ७/अ | ०-१७-०० | २-५४ |
| ५) प्रमोद धरमसी पटेल<br>६) प्रल्हाद अर्जुन पटेल<br>७) महेश धरमसी पटेल<br>८) राजेश अर्जुन पटेल<br>९) वसंत अर्जुन पटेल<br>१०) शांतीलाल रामजी पटेल | ६९ | ७/ब | ०-१८-२० | २-७४ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेल्या मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील वर्णनाच्या मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०९/२०२६

**ॲड. शिल्पी प्रशांत परदेशी**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता. रत्नदुर्ग अपार्टमेन्ट, शिवाजी महाराज चौक जवळ, पाटील आळी कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.
मोबाईल नंबर ९५०३१५२५२४.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि.रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल dd_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र.११/ मा.अभि./जाहीर नोटीस /१७१२/सन २०२६ दिनांक : ०८/०९/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

तानाजी मालुसरे सिटी पुष्पक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. शिरसे गांव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड यांनी शेल्ट्रेक्स कर्जत प्रा.लि. जुनी गोपी रिसॉर्ट, प्रा. लि. तानाजी मालुसरे सिटी कर्जत, शिरसे गाव, तालुका कर्जत जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१०२०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता. कर्जत, गाव शिरसे येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ७/ब/१, ७/ब/२, ७/ब/३, ७/ब/४, ७/ब/५, ७/ब/६, ७/ब/७, ७/ब/८, ७/ब/९, ७/ब/१०, ७/ब/११, ७/ब/१२, ७/ब/१३, ७/ब/१४ याचे एकूण क्षेत्र पैकी १२७२.१५ चौ.मी. क्षेत्र

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २४/०९/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ०८/०९/२०२६

सही/-
**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## अलिबाग येथील मे.जिल्हा न्यायाधिश सो.यांचे न्यायालयात

Civil M.A 44/2026

श्री.धनाजी नामदेव नाखवा अर्जदार
विरूद्ध
श्री.मनोहर नामदेव नाखवा सामनेवाला
व इतर ४

या जाहीर नोटीसीने अर्जदार यांचे तर्फे जाहीर करण्यात येते की,
१) अर्जदार यांचे वडील कै.नामदेव सदाशिव नाखवा यांचे राहत्या घरी दिनांक १४/०३/२०२४ रोजी मौजे बोडणी, पो.सारळ, ता.अलिबाग जि.रायगड येथे निधन झाले आहे. कै.नामदेव सदाशिव नाखवा यांना ०४ मुले व ०२ मुली असे कायदेशीर वारस आहेत.
२) कै.नामदेव सदाशिव नाखवा यांची स्वतःची स्वकष्टाने संपादित केलेली खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-**

| अ. क्र. | मौजे | गट क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | म्हात्रोळी | ३५७ | ०-२४-२०<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-२५-०० | ७.५६ |
| २ | सारळ | ३३२ | ०-१२-९०<br>पो.ख.०-००-८०<br>एकूण ०-१२-९० | ०.९१ |
| ३ | सारळ | १५६ | ०-५९-१०<br>पो.ख.०-०१-५०<br>एकूण ०-६०-६० | ६.६७ |
| ४ | मौजे कोप्रोली येथील मालमत्ता क्र.२०५ क्षेत्र ८२.२८ चौ.मी सदरची मिळकत ही फॉरेस्ट च्या अंतर्गत येत असून त्यास ७/१२ नाही. | | | |

३) वरील मिळकत कै.नामदेव सदाशिव नाखवा यांनी दिनांक ०८/०८/२०२३ रोजी नोटराईज मृत्युपत्राद्वारे अर्जदार यांस दिलेली आहे.
४) कै.नामदेव सदाशिव नाखवा यांनी ०८/०८/२०२३ रोजी केलेल्या मृत्युपत्राचे प्रोबेट मिळण्यासाठी अर्जदार यांनी या मे.न्यायालयात अर्ज केला आहे.
तरी वरील मिळकतीची अन्य कोणाचा कसलाही हितसंबंध असल्यास या प्रोबेट अर्जाच्या चौकशीच्या वेळी त्या हितसंबंध असलेल्या व्यक्तीने जातीने अथवा मुखत्यारामार्फत मे.न्यायालयात दिनांक २२/९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर राहून आपले म्हणणे मांडावे.
या मुकर्रर केलेल्या दिवशी व वेळी कोणीही उपस्थित न राहिल्यास प्रोबेट अर्जाच्या चौकशीचे पुढील काम केले जाईल व मे.न्यायालयामार्फत योग्य तो हुकूम केला जाईल याची दक्षता घ्यावी.

अलिबाग
दिनांक :
(शिक्का)

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड अलिबाग**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड अलिबाग**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**
**फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २२.०१.२०१६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक २३.०६.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. नमो साई कन्स्ट्रकशन प्रा. लि. कर्जदार श्री.अनंत गणपत म्हात्रे मु-पो-चिंचपाडा, ता-पेण, जि-रायगड व कर्जदार श्री. हरीभाऊ गणपत म्हात्रे मु-पो-कांदळेपाडा, ता-पेण, जि-रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक २३.१२.२०१५ पर्यंतची रक्कम रुपये २,७०,३२,६००/- व दिनांक २४.१२.२०१५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १४ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून श्री. अनंत गणपत म्हात्रे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन गाव कांदळेपाडा ता.पेण सर्वे नं. १८५ क्षेत्र ०-९०-८०, पेण ग्रामीण ता. पेण सर्वे नं. १०१/५ क्षेत्र ०-०३-१०, गाव आंबेघर ता. पेण सर्वे नं. ९४ क्षेत्र ०-२७-१० व सर्वे नं. ३३ क्षेत्र ०-४९-९०, ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता.पेण मालमत्ता क्र.५२२ क्षेत्रफळ ८९९ चौ.फुट, चिंचपाडा ता. पेण नगर परिषद हद्दीतील मालमत्ता क्रमांक ७/२२३ ब्लॉक नं.१०३ येथील वरील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर च्या दिनांक २३.१२.२०१५ रोजी येणे रक्कम रूपये २,७०,३२,६००/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. अनंत गणपत म्हात्रे**

श्री. अनंत गणपत म्हात्रे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन
१. गाव कांदळेपाडा ता.पेण सर्वे नं.१८५ क्षेत्र ०-९०-८०
२. पेण ग्रामीण ता. पेण सर्वे नं.१०१/५ क्षेत्र ०-०३-१०
३. गाव आंबेघर ता. पेण सर्वे नं. ९४ क्षेत्र ०-२७-१० व सर्वे नं.३३ क्षेत्र ०-४९-९०
४. ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता.पेण मालमत्ता क्र.५२२ क्षेत्रफळ ८९९ चौ.फुट ५. चिंचपाडा ता. पेण नगर परिषद हद्दीतील मालमत्ता क्रमांक ७/२२३ ब्लॉक नं.१०३

स्थळ : पेण
दिनांक

**श्री.अजित नामदेव भगत**
**वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## ग्रामपंचायत सहाण

**ता.अलिबाग, जि.रायगड**
**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र ग्रा.पं.अधिनियम १९५९ व कर फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रामपंचायत सहाणकडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत सहाणकडे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | घर क्रमांक | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नांव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | ५१६ | विनय जयवंत वैद्य | श्रीमती उज्वला प्रभाकर शिर्के |

सही/-
**श्रीम. संकिता शैलेश पाटील**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत सहाण**

सही/-
**शैलेश भास्कर वर्तक**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत सहाण**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायम ची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे -कडाव, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| जमीन मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| परिझाद गीतेन पोलाडिया | ८१ | ४ | ०-२०-०० | ०-२२ |
| परिझाद गीतेन पोलाडिया | ८० | ४/ब | ०-२१-०० | २-३१ |

**मौजे-टाकवे, तालुका-कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| परिझाद गीतेन पोलाडिया | ५७ | २ | ०-४८-८० | ७-५६ |

सदरची जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, कुलमुखत्यारपत्र, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०९/२०२६

अधिवक्ता
**स्वनिल बाबुराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं.५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**
**फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १६.०२.२०१८ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १४/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. दिलीप मधुकर म्हात्रे मु-प्रसाद बंगला, वडगाव, ता- पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १०/०१/२०१८ पर्यंतची रक्कम रूपये २०,२९,५०७/- व दिनांक ११/०१/२०१८ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितल होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून श्री. दिलीप मधुकर म्हात्रे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन गांव काळेश्री ता.पेण सर्व्हे क्र.२५/१ क्षेत्र ०-७६-९० व गांव वडगांव ता.पेण सर्व्हे क्र. ९४/४ अ क्षेत्र ०-३५-०० पैकी श्री दिलीप मधुकर म्हात्रे यांच्या नावे असलेली ०.०३.०० ही जागा व त्यावरील असलेले ग्रामपंचायत मळेघर तालुका पेण हद्दीतील मिळकत क्र.५०२ क्षेत्रफळ २४४८ चौ.फुट येथील वरील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर च्या दिनांक १०/०१/२०१८ रोजी येणे रक्कम रूपये २०,२९,५०७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. दिलीप मधुकर म्हात्रे**

श्री. दिलीप मधुकर म्हात्रे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन.
१. गांव काळेश्री ता. पेण सर्व्हे क्र. २५/१ क्षेत्र ०-७६-९०
२. गांव वडगांव ता.पेण सर्व्हे क्र. ९४/४ अ क्षेत्र ०-३५-०० पैकी श्री दिलीप मधुकर म्हात्रे यांच्या नावे असलेली ०.०३.०० ही जागा व त्यावरील असलेले ग्रामपंचायत मळेघर तालुका पेण हद्दीतील मिळकत क्र.५०२ क्षेत्रफळ २४४८ चौ. फुट

स्थळ : पेण
दिनांक :

**श्री.अजित नामदेव भगत**
**वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# रोहित, विराटला खेळताना पाहण्याची उत्सुकता

- एकदिवसीय सामन्यांवर चाहत्यांची नजर
- न्यूझीलंड विरूद्ध मालिकेची प्रचंड क्रेज

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

रोहित शर्मा आणि विराट कोहली हे फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळत आहेत. इंग्लंड दौऱ्यानंतर भारताची एकदिवसीय मालिका झालेली नाही. त्यातच आता भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी मैदानावर उतरणार आहे. त्यामुळे दोघांचेही चाहते या दोघांना मैदानावर खेळताना पाहण्यासाठी उत्सूक आहेत. त्यामुळे अगामी टी-२० मालिकेपेक्षा रोहित व विराट यांना खेळताना पाहण्याची उत्सुकता त्यांच्या चाहत्यांना लागली आहे. त्यातच चाहत्यांमध्ये भारत विरुद्ध न्यूझीलंड मालिकेची प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. या मालिकेसाठी आतापर्यंत ५० हजारांपेक्षा अधिक तिकिटे विकली गेली आहेत.

रोहित शर्मा आणि विराट कोहली हे फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळत आहेत. मात्र, अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेनंतर भारतीय संघ वेस्ट इंडिजविरुद्ध घरच्या मैदानावर दि. २७सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या कालावधीत ३ एकदिवसीय व ५ टी-२० सामने खेळणार आहे. ही मालिका रोहित व विराट यांच्या चाहत्यांसाठी खास असणार आहे. विंडीजविरुद्धच्या मालिकेनंतर लगेचच भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. यावेळी भारत तब्बल ६ वर्षांच्या कालावधीनंतर न्यूझीलंडचा दौरा करणार आहे. त्यामध्ये ५ एकदिवसीय, ५ टी-२० व २ कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या दौऱ्याचा कालावधी दि.२२ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर असा असणार आहे. रोहित व विराटचा हा कदाचीत शेवटचा न्यूझीलंड दौरा असू शकतो. त्यामुळे ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका ५ सामन्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. दरम्यान, चाहत्यांमध्ये भारत विरूद्ध न्यूझीलंड दौऱ्याचा प्रचंड क्रेझ दिसून येत आहे. यामध्ये तिन्ही प्रकारचे सामने खेळले जाणार असून, चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह निर्माण झाला आहे. न्यूझीलंड क्रिकेटनेही याचा पुरावा दिला. त्यांनी सांगितले की, तिन्ही फॉरमॅटमधील या मालिकेसाठी आतापर्यंत ५० हजारांपेक्षा अधिक तिकिटे विकली गेली आहेत.

त्यानंतर पुढील तिन्ही मालिका या घरच्या मैदानावर खेळवल्या जाणार आहेत. श्रीलंका, झिम्बाब्वे व ऑस्ट्रेलियाचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. यावेळी श्रीलंकेचा संघ दि.१३ ते २७डिसेंबर या कालावधीत भारत दौऱ्यावर ३ एकदिवसीय व ३ टी-२० सामने खेळणार आहे. झिम्बाब्वेचा संघ पुढील वर्षी ३ एकदिवसीय सामन्यांसाठी दि.३ ते ९ जानेवारीमध्ये भारतात असणार आहे.

### ५०,००० तिकीटांची विक्री

न्यूझीलंड क्रिकेटने जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले की, विक्रीच्या पहिल्या आठवड्यात विक्रमी प्रतिसाद मिळाल्यानंतर, आतापर्यंत ५०,००० हून अधिक तिकिटांची विक्री झाली आहे. दोन आठवड्यांच्या 'प्री-सेल' (पूर्व-विक्री) कालावधीनंतर सोमवारी (दि.७) सर्वसामान्यांसाठी तिकिटांची विक्री सुरू झाली. अनेक सामन्यांची तिकिटे पूर्णपणे विकली जाण्याच्या मार्गावर आहेत; त्यामध्ये क्राइस्टचर्च येथे होणाऱ्या भारत विरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्याचाही समावेश असून, त्याची ७५ टक्के तिकिटे आधीच विकली गेली आहेत.



## हार्दिक पांड्याचे पुनरागमन?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलिया संघ पुढच्या वर्षाच्या सुरुवातीलाच भारत दौरा करणार असून, ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. मात्र, त्याआधी पूर्वतयारी म्हणून ऑस्ट्रेलिया 'अ' संघ सप्टेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार असून, कसोटी (४ दिवसीय सामने) आणि एकदिवसीय मालिका खेळणार आहे. या मालिकांसाठी बुधवारी (दि.९) भारतीय 'अ' संघांची घोषणा झाली आहे. भारत 'अ' आणि ऑस्ट्रेलिया 'अ' संघ २२ सप्टेंबरपासून पहिला ४ दिवसीय सामना खेळणार आहे. त्यानंतर २९ सप्टेंबरपासून दुसरा ४ दिवसीय सामना खेळणार आहे. त्यानंतर ६, ९ आणि ११ ऑक्टोबर रोजी एकदिवसीय सामने या दोन संघात होतील. भारतीय 'अ' एकदिवसीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी ऋतुराज गायकवाडकडे असणार आहे. त्याच्यासह पडिक्कल उपकर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळेल. या संघात हार्दिक पांड्याचाही समावेश आहे. यंदाच्या आयपीएल नंतर हार्दिक पाठ आणि पायाच्या दुखापतींमुळे तीन महिने क्रिकेटपासून दूर होता.

## पूर्व विभागाची मजबूत पकड

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



दुलीप चषकाचा अंतिम सामना पूर्व विभाग विरुद्ध दक्षिण विभाग संघात चेन्नईमध्ये सुरू असून, चौथ्या दिवसाचा खेळ पूर्ण झाला आहे. अद्यापही पूर्व विभागाची पकड सामन्यावर मजबूत असून, आता त्यांच्याकडे तब्बल ५८४ धावांची मोठी आघाडी आहे. यावेळी दुसऱ्या डावातही पूर्व विभागाचा कर्णधार ईशान किशन चमकला आहे. त्याने अर्धशतक पूर्ण केले, मात्र त्याचे शतक २० धावांनी हुकले.

या सामन्यात चौथ्या दिवशी दक्षिण विभागाचा पहिला डाव ३३६ धावांवर संपला. कर्णधार तिलक वर्माने चांगली फलंदाजी केली. तो ९९ धावांवर बाद झाला. केले. त्याला चमा मिलिंदने (४३ धावा) चांगली साथ दिली. तसेच, या डावात तिसऱ्या दिवशी देवदत्त पडिक्कलने ६२ धावांची खेळी केली. परंतु, या तिघांशिवाय दक्षिण विभागाकडून फार खास काही कोणाला करता आले नाही. त्यामुळे पूर्व विभागाने तब्बल ३७२ धावांची आघाडी घेतली. मात्र, यानंतरही त्यांनी फॉलोऑन न देता दुसऱ्या डावात फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पूर्व विभाग दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरले. मात्र, दुसऱ्या डावात पूर्व विभागाचे सलामीवीर वैभव सूर्यवंशी (८) आणि अभिमन्यू ईश्वरन (३) स्वस्तात बाद झाले. त्यानंतर शिखर मोहन आणि कर्णधार ईशान किशन या दोघांनी संघाचा डाव सावरताना १२६ धावांची भागीदारी केली. त्यानंतर मात्र ईशान मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात असताना तो ८० धावांवर माघारी परतला. त्यालंती शिखर मोहनने अर्धशतक केले आणि ५२ धावा करून पायचीत झाला. सुदीप कुमार घरामीही २ धावांवर धावबाद झाला. अखेर दिवस संपेपर्यंत कुमार कुशाग्र आणि कुनैन कुरेशी यांनी डाव सांभाळत आणखी गडी बाद होऊ दिले नाही. पूर्व विभागाच्या चौथ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा ५१ षटकात ५ बाद २१२ धावा झाल्या होत्या आणि त्यांच्याकडे ५८४ धावांची आघाडी आहे. कुमार कुशाग्र ३४ धावांवर आणि कुनैन कुरेशी २६ धावांवर नाबाद आहे.

## निवडक



### धाराशिव संघाने पटकावले विजेतपद

**छ. संभाजीनगर :** आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ व डी फार्मसी कॉलेज धाराशिव यांच्यावतीने गुरुवर्य केशवराव तुकाराम पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेली ढकली व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेला महाराष्ट्रासह तब्बल सहा राज्यांमधून ७० हून अधिक संघांनी सहभाग नोंदवला. दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उत्कृष्ट नियोजन, दर्जेदार सामने आणि खेळाडूंना मिळालेली उत्तम सुविधा यामुळे ही स्पर्धा विशेष ठरली. या स्पर्धेत ४०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवत स्पर्धेची भव्यता वाढवली. धाराशिवसारख्या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा केवळ राज्यातीलच नव्हे, तर भारतातील सर्वात मोठ्या व्हॉलीबॉल स्पर्धांपैकी एक ठरली. या स्पर्धेत धाराशिव व्हॉलीबॉल संघाने विजेतपद पटकावले. सोलापूर पोलीस संघाने उपविजेतपद, आमेर सोलापूर संघाने तृतीय क्रमांक, तर जेजुरी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

### भारतीय संघाचा राहण्याचा प्रश्न सुटला

**नवी दिल्ली :** जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारे भारतीय क्रिकेटपटू आयोजन समितीने निश्चित केलेल्या निवासस्थानी राहणार आहेत. मात्र, त्यांना परदेश दौऱ्यांदरम्यान मिळणाऱ्या पंचतारांकित हॉटेलसारख्या सुविधा मिळणार नाहीत. याबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी मंगळवारी माहिती दिली. आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी नागोयामध्ये उच्च दर्जाच्या हॉटेल्सची कमतरता असल्याने क्रिकेटपटूंच्या राहण्याबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. मात्र, शुक्ला यांनी स्पष्ट केले की, राहण्याबाबत कोणतीही मोठी समस्या नाही आणि बीसीसीआय तसेच खेळाडू सध्याच्या व्यवस्थेवर समाधानी आहेत. भारतीय पथकाच्या निरोप समारंभात बोलताना शुक्ला म्हणाले, "आम्ही आयोजकांनी उपलब्ध करून दिलेल्या ठिकाणी राहणार आहोत. खेळाडूंना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी आम्ही निवास व्यवस्थेवर सतत लक्ष ठेवून आहोत. हे नक्कीच पंचतारांकित हॉटेल नाही, मात्र ती एक चांगली आणि आरामदायक निवास व्यवस्था आहे."

## पाक संघात बाबर आझमला किंमत नाही?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



लॉर्ड्सवर झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानच्या कसोटी संघात मोठे बदल करण्यात आले. मात्र, या बदलांबद्दल कर्णधार बाबर आझमला आधी कोणतीही कल्पना देण्यात आली नव्हती. तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी बाबरने ही बाब उघड केली. दरम्यान, बाबरने सांगितले की, या निर्णयांबाबत त्याच्याशी कोणतीही चर्चा करण्यात आली नव्हती आणि अधिकृत घोषणा झाल्यानंतरच त्याला संघातील बदलांबद्दल समजले.

तिसऱ्या कसोटीपूर्वी एजबॅस्टन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत बाबरला संघातील या मोठ्या बदलांबद्दल विचारण्यात आले. त्यावर तो म्हणाला, "मलाही याची कल्पना नव्हती. पीसीबीने हा निर्णय घेतल्याचे मला नंतर समजले, त्यामुळे याबद्दल तेच अधिक चांगली माहिती देऊ शकतील." दरम्यान, लॉर्ड्सवर पाकिस्तानचा १९४ धावांनी पराभव झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पीसीबीने या मोठ्या बदलांची घोषणा केली. बोर्डाने सात खेळाडूंना वगळले आणि मुख्य प्रशिक्षक सरफराज अहमद व गोलंदाजी प्रशिक्षक उमर गुल यांना पदावरून हटवले आहे.

## रायगड जिल्ह्यातील चार पंच उत्तीर्ण

- अंतिम पंच परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर
- तीन वर्षांच्या कालावधीत १८ पंच तयार

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |



महाराष्ट्र क्रिकेट असो.च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या अंतिम पंच पारीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. यावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे चार पंच यशस्वी रित्या उत्तीर्ण झाले आहेत. त्यात उरणचे सुरेश म्हात्रे व रविंद्र म्हात्रे, अलिबागचे अभिजित वाडकर आणि रसायनीचे निशांत माळी यांनी एमसीए प्रमाणित पंच होण्याचा मान मिळवला आहे.

जिल्ह्यात क्रिकेट खेळाचे स्तर उचविण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने सातत्याने जिल्ह्यातील क्रिकेट पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. हे प्रशिक्षण शिबीर ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून घेण्यात आले असून, महाराष्ट्र क्रिकेट असो.च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पंच परीक्षेसाठीच्या पूर्व तयारी करीत हे प्रशिक्षण शिबीर अत्यंत उपयुक्त ठरली आहेत. परिणामी गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यात अठरा एमसीए प्रमाणित पंच तयार झाले आहेत. जिल्ह्यातील सर्व पंचांना प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा, माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, रुपेश खडगी, मुंबई क्रिकेट असो.चे पंच राजन कसबे यांनी बहुमूल्ये योगदान दिले आहे. दरम्यान, एमसीए पंच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व पंचांना रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मार्क चॅपमनची करारातून माघार

| ऑकलंड | वृत्तसंस्था |

न्यूझीलंडचा फलंदाज मार्क चॅपमनने २०२६-२७ हंगामासाठीच्या आपल्या केंद्रीय करारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने न्यूझीलंड क्रिकेटसोबत एक पर्यायी करार स्वीकारला आहे, त्यामुळे तो बिग बॅश लीगमध्ये खेळण्यासाठी उपलब्ध राहील. चॅपमन न्यूझीलंडच्या भारताविरुद्धच्या आगामी मायदेशातील मालिकेत खेळण्यासाठी उपलब्ध असेल. फिन लन, लॉकी फर्ग्युसन, डम मिल्ने आणि टिम सेफर्ट हे देखील अशाच पर्यायी करारांवर आहेत. आगामी बिग बॅश लीग हंगाम दि.१२ डिसेंबर ते २६ जानेवारी दरम्यान खेळवला जाणार आहे.

## पाकिस्तानी खेळाडूंवर कारवाईचे ग्रहण

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आशियाई क्रिकेट परिषद आयोजित महिला आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाही. कर्णधार फातिमा सनानंतर आता संघाची यष्टिरक्षक-फलंदाज गुल फिरोजावरही आयसीसीने कारवाई केली आहे. हाँगकाँगविरुद्धच्या साखळी सामन्यादरम्यान आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुलवर तिच्या सामन्याच्या मानधनाच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. ही घटना दि.७सप्टेंबर रोजी दुबईमध्ये खेळल्या गेलेल्या पाकिस्तान आणि हाँगकाँगच्या सामन्यात पाकिस्तानच्या डावातील पाचव्या षटकात घडली.

## ब्रिजेंद्र सिंग डोप चाचणीत दोषी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



आशियाई बीच गेम्समध्ये रौप्यपदक जिंकणाऱ्या भारतीय कबड्डी संघाचा सदस्य ब्रिजेंद्र सिंग चौधरी स्पर्धे दरम्यानच्या डोप चाचणीत दोषी आढळल्याने त्याचे पदक काढून घेण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेने सांगितले की, दि.२७ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या स्पर्धेदरम्यानच्या डोप चाचणीत चौधरी प्रतिबंधित डाययुरेटिक (मास्किंग एजंट) ब्रिंझोलामाइड वापरल्याबद्दल दोषी आढळला असून, त्याने बंदी स्वीकारली आहे. ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाच्यावतीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय कबड्डीपटू ब्रिजेंद्र सिंग चौधरीवर डोपिंग विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. ब्रिंझोलामाइड हे जागतिक डोपिंग विरोधी संस्थेद्वारे प्रतिबंधित पदार्थ म्हणून सूचीबद्ध आहे आणि स्पर्धेदरम्यान तसेच स्पर्धेबाहेरही ते नेहमी प्रतिबंधित आहे. आयटीएने म्हटले आहे की, खेळाडूने ओसीएच्या उत्तेजक-विरोधी नियमांनुसार केलेल्या उल्लंघनाचे परिणाम स्वीकारले आहेत. त्यामध्ये उत्तेजक-विरोधी नियमांच्या उल्लंघनाची पुष्टी आणि सान्या २०२६ येथे झालेल्या ६व्या आशियाई बीच गेम्समधील त्याचे वैयक्तिक निकाल रद्द करणे, तसेच पुरुषांच्या बीच कबड्डी स्पर्धेतील त्याच्या दुसऱ्या स्थानाचाही समावेश आहे.

## तिलकच्या सातत्यपूर्ण खेळीची 'कसोटी'

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



- तिलक वर्माची एकाकी झुंझ
- भारताच्या कसोटी संघात पदार्पणाची शक्यता

पूर्व विभागाने दुलीप चषकाच्या अंतिम सामन्यातील पहिल्या डावात ३७२ धावांची आघाडी घेतली. पूर्व विभागाच्या ७०८ धावांचा पाठलाग करताना दक्षिण विभागाचा पहिला डाव ३३६ धावांवर गुंडाळाल गेला. यावेळी कर्णधार तिलक वर्माने एकाकी झुंज देताना संघाचा डोलारा सांभाळला होता; परंतु, तो ९९ धावांवर बाद झाला आणि संघाचा डाव संपुष्टात आला. मात्र, तिलकने सातत्यपूर्ण खेळ करत भारताच्या कसोटी संघाचे दार ठोठावले आहे.

या सामन्यात रिकी भूई (१) स्वस्तात बाद झाल्यानंतर नारायण जगदीसन व देवदत्त पडिक्कल यांनी डाव सावरला होता. जगदीसन ३२ धावांवर माघारी परतल्यानंतर शैक रशीद (२७) यालाही मोहम्मद शमीने पायचीत केले. मात्र, तिलक व देवदत्त उभे राहिले. श्रीलंका दौरा गाजवून दुलीप चषकात खेळणाऱ्या देवदत्तने ६२ धावा केल्या. मात्र, तो बाद झाला आणि सर्व भार तिलकच्या खांद्यावर आला. तळाच्या फलंदाजांनी त्याला साथ देण्याचा प्रयत्न केला; परंतु, त्यांना मोठी भागीदारी रचता आली नाही. रवीचंद्रन स्मरण (२३), श्रेयस गोपाळ (२६) हेही फार कमाल करू शकले नाही. चमा मिलिंदने ४३ धावा करून तिलकला चांगली साथ दिली; परंतु, एस मोहनने त्याला बाद केले. तरी तिलक खिंड लढवत होता, अखेर १०८ व्या षटकात तो बाद झाला. कुरेशीने स्वतःच्याच गोलंदाजीवर तिलकचा झेल टिपला. तो २११ चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने ९९ धावांवर बाद झाला आणि दक्षिण विभागाचा पहिला डाव ३३६ धावांवर गडगडला. यावेळी मुकेश कुमारने ३, तर मोहम्मद शमी, कौनैन कुरेशी व शिखर मोहन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### उपांत्य फेरीसाठी चार संघ निश्चित | आज भारताची बांगलादेश संघाशी टक्कर

# आशिया चषकाची घोडदौड अंतिम टप्प्यात

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



महिला आशिया चषका २०२६ मध्ये विजेतेपदाच्या शर्यतीत आता केवळ चार संघ उरले आहेत. बांगलादेशने आपल्या गटातील शेवटच्या सामन्यात संयुक्त अरब अमिरातीचा ३४ धावांनी पराभव करून उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले आहे. या निकालामुळे स्पर्धेतील अंतिम चार संघ निश्चित झाले आहेत. भारत, पाकिस्तान आणि श्रीलंका नंतर आता बांगलादेशने उपांत्य फेरीत जागा पक्की केली आहे.

महिला आशिया चषकाच्या उपांत्य फेरीतील जागा भारत, पाकिस्तान आणि श्रीलंका यांनी याआधीच पक्की केली होती; त्यांना आता बांगलादेशची साथ मिळाली असून, बांगलादेश उपांत्य फेरीत पोहोचणारा चौथा संघ ठरला आहे. या विजयाचे मुख्य श्रेय बांगलादेशच्या गोलंदाजांना जाते, त्यांनी समोर १०४ धावांचे लक्ष्य ठेवले आणि संपूर्ण डावादरम्यान प्रतिस्पर्धी फलंदाजांना रोखून धरले. प्रथम फलंदाजी करताना, बांगलादेशला सुरुवातीच्या ६ षटकांत केवळ २१ धावा करता आल्या आणि दोन बळी गमवावे लागले. मात्र, त्यानंतर त्यांनी डाव सावरला. २० षटकांत ७ बाद १०३ धावांपर्यंत मजल मारली. १०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युएईची सुरुवात त्याहूनही खराब झाली. बांगलादेशच्या गोलंदाजांनी पॉवरप्लेमध्येच दोन बळी टिपले. सहा षटकांनंतर युएइची धावसंख्या २ बाद १५ अशी होती. १० षटकांच्या समाप्तीपर्यंत संघाला केवळ ३४ धावा करता आल्या. बांगलादेशने नियमित अंतराने बळी घेत आणि धावांचा वेग रोखून दबाव कायम ठेवला. त्यामुळे युएई संघाला २० षटकांत ९ बाद केवळ ६९ धावा करता आल्या. परिणामी, बांगलादेशने हा सामना ३४ धावांनी जिंकला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला.

या स्पर्धेत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणारा भारत हा पहिला संघ होता. त्यानंतर, श्रीलंका संघाने 'गट ब' मधून अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. ७ सप्टेंबरच्या रात्री पाकिस्ताननेही उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. आता बांगलादेशच्या विजयानंतर उपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट झाले आहे. 'गट अ' मध्ये भारत अव्वल स्थानावर राहिला, तर पाकिस्तानने दुसरे स्थान मिळवले. 'गट ब' मध्ये श्रीलंका पहिल्या आणि बांगलादेश दुसऱ्या स्थानावर राहिले. परिणामी, पहिल्या उपांत्य सामन्यात भारताचा सामना आज (दि.१०) बांगलादेशशी होणार असून, दुसरा उपांत्य सामना शुक्रवारी (दि.११) श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्या पार पडणार आहे. हे दोन्ही सामने रात्री ८.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) सुरू होणार असून, दुबईमध्ये खेळवले जाणार आहेत. तसेच, या स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी (दि.१३) दुबईमध्ये खेळवला जाणार आहे.

## साईच्या 'इंग्लिश' फिरकीची कमाल

| लंडन | वृत्तसंस्था |



भारताचा डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोरने इंग्लिश काउंटी चॅम्पियनशिपमध्ये आपली छाप पाडली आहे. ग्लॉस्टरशायरकडून खेळताना, त्याने डर्बीशायरविरुद्ध २० धावांत ५ बळी घेत आपल्या संघाला २१३ धावांनी विजय मिळवून दिला. आर. साई किशोरने दुसऱ्या डावात गोलंदाजीची सुरुवात केली आणि १८ षटके टाकली, त्यापैकी १२ षटके निर्धाव होती. त्याने आपल्या पहिल्या ८ षटकांत केवळ सहा धावा देत ५ बळी घेतले. साई किशोरने डर्बीशायरच्या पहिल्या ७ फलंदाजांपैकी ५ फलंदाजांना बाद केले. हॅरी केम, मॅथ्यू मॉन्टगोमेरी, वेन मॅडसेन, अनेउरिन डोनाल्ड आणि ब्रुक गेस्ट. त्यामुळे डर्बीशायरची धावसंख्या १५ षटकांत ६ गडी बाद ४१ अशी झाली. साई किशोर व्यतिरिक्त, ऑलिव्हर प्राइसने ३ आणि एड मिडलटनने २ बळी घेत डर्बीशायरला ३८.५ षटकांवर आणले. साई किशोरने सामन्यात एकूण ७ बळी घेतले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)